अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | मंगळवार, दि.७ फेब्रुवारी २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १३२ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## सिमेंटच्या बलकरखाली आल्याने वृद्धाचा मृत्यू

**सोलापूर** : जड वाहतूक रात्री नऊ नंतर सुरू झाल्यानंतरही शहरात अपघाताचे बळी थांबायला तयार नाहीत. सोमवारी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास रेल्वे स्टेशन समोरील बाजूस एक वृद्ध साधु पायी स्टेशन जवळील शनी मंदिर कडे चालत जात असताना त्याला सिमेंटच्या बलकर (ट्रक क्र. एम.एच.१३. सीयु. ३५४५) या क्रमांकाच्या बलकर ट्रकने दिल्याने त्यांचा मृत्यू झाला.

सोलापूर शहरात गेल्या काही दिवसांपासून जड वाहतुकीमुळे अनेकांचे बळी गेले आहेत. त्यामुळे नागरिकांनी आणि काही सामाजिक कार्यकर्त्यांनी विरोध केल्यानंतर सोलापूर शहरातून पोलीस आयुक्तांनी एक आदेश काढत जड वाहतूक सकाळी सात ते रात्री नऊ वाजे दरम्यान शहरात बंदी घालण्यात आली.

सिमेंटच्या बलकरने धक्का दिल्यानंतर वृध्द व्यक्तिस मार लागल्यामुळे ती व्यक्ती खाली कोसळली आणि त्याच्या डोक्यावरून मागील चाक गेल्याने ती व्यक्ती जागेवरच मरण पावली.जड वाहतुकीमुळे पुन्हा एकदा बळी गेला आहे. सदर बझार पोलिसांनी सिमेंटचा बलकर हा पोलीस ठाण्यात नेऊन लावला असून, या घटनेबाबत रात्री उशिरापर्यंत घटनेची नोंद करण्याचे काम सुरू होते.

# निवडणूक बिनविरोध करण्याची असेल तयारी; रासनेंच्या ऐवजी टिळकांना देणार उमेदवारी

सुराज्य/पुणे

**कसब्याच्या आमदार मुक्ता टिळक यांच्या निधनानंतर लागलेल्या पोटनिवडणुकीत उमेदवारी न मिळाल्यामुळे टिळकांनी दाखवलेली नाराजी, मतदारसंघात प्रचंड प्राबल्य असतानाही उमेदवारासाठी डावलल्यामुळे ब्राम्हण समाजाने पुकारलेला यल्गार आणि गेल्या अनेक वर्षांपासून मतदारसंघावर मजबूत पकड असणारे कसब्याचे माजी आमदार आणि पुण्याचे विद्यमान खासदार गिरिष बापट आजारपणामुळे अंथरुणाला खिळलेले असताना कसब्यात निवडणूक जिंकणे अवघड झाल्यामुळे भाजपने काँग्रेसमोर बिनविरोध निवडणुकीचा पत्ता टाकला आहे. बिनविरोधाची असेल तयारी तर रासनेंच्या ऐवजी टिळकांनी देऊ उमेदवारी, अशी घोषणा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली होती. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनीही टिळकवाड्याला भेट दिल्यानंतर चंद्रकांतदादांचीच री ओढत निवडणूक बिनविरोध करण्याचे आवाहन काँग्रेसला केले आहे.**

सोमवारचा दिवस पुण्यातील राजकीय घडामोडींनी राज्याचे लक्ष वेधून घेणारा ठरला. उमेदवारी जाहीर होताच काँग्रेसचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी पहिल्यांदा दिवंगत आ. मुक्ता टिळक यांचा टिळकवाडा गाठला. त्यांनी लोकमान्यांच्या पुतळ्याला अभिवादन करून मुक्ताताईंच्या घरी त्यांच्या प्रतिमेसमोर आदरांजली वाहिली. यावेळी मुक्ताताईंचे पती शैलेश टिळक, चिरंजीव कुणाला टिळक, पुतणे रोहित टिळक

## बावनकुळेंनी ओढली चंद्रकांतदादांची री

उपस्थित होते. यावेळी टिळक परिवाराची नाराजी लपून राहिली नाही. त्यानंतर हिंदू महासभेच्या पदाधिकाऱ्यांनीही शैलेश टिळक यांच्या घरी भेट घेऊन भाजपविरोधात निवडणूक लढवण्याचे जाहीर केले. त्यामुळे भाजपच्या गोठात प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली. तिकडे टिळक रस्त्यावरील गणेश कला क्रीडा मंदिरात उमेदवारी अर्ज भरल्यानंतर लगेचच भाजप प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी टिळकांचा टिळकवाडा गाठला आणि टिळक परिवाराची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर लगेचच टिळकांना उमेदवारी देऊ; पण निवडणूक बिनविरोध करा, असे आवाहन त्यांनी काँग्रेसला केले.





''ही निवडणूक बिनविरोध करायची नसल्यामुळे नाना पटोले असे म्हणतात की टिळकांच्या घरात उमेदवारी दिली असती तर आम्ही बिनविरोधाचा विचार केला असता. माझे नाना पटोलेंना आवाहन आहे, टिळकांना उमेदवारी देतो, तुम्ही बिनविरोध करता का?''

**– चंद्रकांत पाटील (पालकमंत्री)**



''उद्या ३ वाजेपर्यंत महाविकास आघाडीने जर ही निवडणूक बिनविरोध केली, तर आम्ही उद्या हेमंत रासने यांची उमेदवारी मागे घेऊ आणि टिळकांना उमेदवारी देऊ. नाना पटोले यांना विनंती आहे की विधानसभा निवडणुकीसाठी एकच वर्ष बाकी आहे. त्यामुळे लोकांवर निवडणूक लादू नये.''

**– चंद्रशेखर बावनकुळे** (भाजपचे प्रदेशाध्यक्ष)

### रॅलीपासून टिळक परिवार अलिप्त

दरम्यान, हेमंत रासने यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी भाजपने कसबा गणपतीपासून भलीमोठी रॅली काढली होती. या रॅलीकडे टिळक परिवाराने पाठ फिरवली. टिळक परिवारातील कोणीही या रॅलीत सहभागी झाले नाहीत. याचीच चर्चा संपूर्ण पुणे शहरात सुरू झाली. मुक्ताताईंच्या घरातच उमेदवारी द्यायला हवी होती, अशी प्रतिक्रिया सगळीकडेच उमटली. त्यानंतर रासनेंचा उमेदवारी अर्ज दाखल केल्या केल्या बावनकुळे टिळकवाड्यात दाखल झाले.

### आधी कुलकर्णी, आता टिळक, नंतर बापट...

चंद्रकांत पाटील यांना उमेदवारी देऊन भाजपने पहिल्यांदा कोथरूड मतदारसंघातील भाजपच्या तत्कालीन आमदार मेधा कुलकर्णी यांचे तिकीट कापले. त्यानंतर आता रासने यांच्यासाठी कसब्यात भाजपने टिळकांची उमेदवारी कापली. आता अन्य कोणासाठी तरी भाजप बापटांचीही उमेदवारी कापेल, अशा आशयाचे फलक पुण्यात झळकले असून भाजपने मात्र या फलकांची चांगलीच धास्ती घेतल्याचे बोलले जात आहे.

## गर्भवती विवाहितेस लाथांनी मारहाण; बाळ दगावले; पतीसह ७ जणांवर गुन्हा

### हुंड्याच्या कारणावरून करमाळा येथील प्रकार

सुराज्य/सोलापूर

हुंड्याच्या कारणावरून २७ वर्षीय गर्भवती विवाहितेला लाथाबुक्याने मारहाण केल्याने पोटातच बाळ मयत झाले. त्यानंतर विवाहीतेच्या संमती विना गर्भपात केल्याची घटना करमाळा शहरातील शिवाजीनगर येथे नुकतीच उघडकीस आली. या प्रकरणात करमाळ्याच्या पोलिसांनी विवाहितेच्या पतीसह ७ जणाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

या संदर्भात श्रद्धा हर्षराज बिले (रा. करमाळा, सध्या राहणार बारामती जि.पुणे) हिने दिलेल्या फिर्यादीवरून तिचा पती हर्षराज सुनील बिले, संध्या बिले (सासू), सुनील कोंडीबा बिले (सासरे), शिवराज सुनील बिले (दीर), जयप्रकाश कोंडीबा बिले(चुलत सासरे) सर्व रा. शिवाजी नगर करमाळा, कारंजकर हॉस्पिटल जवळ. राजेंद्र शिंदे आणि अशोक मोरे (रा. करमाळा) अशा सात जणाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

बारामती येथे राहणाऱ्या श्रद्धा हिचा विवाह २०१८ साली हर्षराज बिले(रा.करमाळा) याच्यासोबत रीतीरीवाजाप्रमाणे झाला होता. तीन महिने व्यवस्थित नांदल्यानंतर ती गर्भवती झाली.त्यानंतर तिचा सासरी छळ करण्यात सुरुवात झाली. बारामती येथे ओटी भरण्याचा कार्यक्रम झाल्यानंतर तिचा पती आणि सासू सासरे यांनी तिच्या अंगावरील सर्व दागिने काढून घेतले होते.त्यानंतर तिला मुलगा झाला. करमाळा येथे पुन्हा नांदण्यास गेल्यानंतर वरील आरोपी तिचा जाच करून छळ करण्यास सुरुवात केली. आणि तिला माहेरून ७ लाख रुपये आणण्यास सांगितले. त्याप्रमाणे तिच्या वडिलांनी फ्लॅट घेण्यासाठी ७ लाख रुपये दिले होते. तिच्या अंगावरील सोने आणि वडीलांनी दिलेले पैसे घेऊन त्यांनी फ्लॅट घेतला.

व्यसनाधीन असलेला तिचा पती तिला नेहमीच मारहाण करीत होता. २०२१ साली तिला पुन्हा दिवस गेले होते. पती हर्षराज हा तिला दारूच्या नशेत हे बाळ ठेवायचे नाही असे म्हणत तिच्या पोटावर लाथा मारल्याने बाळ पोटातच मयत झाले होते. त्यानंतर घरातील लोकांनी करमाळा येथील एका रुग्णालयात तिच्या इच्छेविरुद्ध गर्भपात करून बारामती येथे आणून सोडले होते. आठवड्यानंतर श्रद्धा ही करमाळा येथे नांदण्यास आली. त्यावेळी व्यवसायात झालेले कर्ज फेडण्यासाठी आणखी १० लाख रुपये आणण्याची मागणी केली. पैसे आणले नाही तरकर्ज मिळवून देणाऱ्या सोबत संबंध ठेव असे सांगितले होते. तिने नकार दिला असता पती सासू आणि सासऱ्याने तिला रात्रभर काठीने बेदम मारहाण केली. आणि हे प्रकरण माहेरी सांगितली तर तुझ्या एकुलत्या मुलाचा खून करेन अशी त्यांनी धमकी दिली. असे श्रध्दा बिले हिच्या फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास सहाय्यक निरीक्षक जगदाळे हे करीत आहेत. .





## मिर्झापूर वेब सिरीज पाहून भाई बनण्याचे स्वप्न पोलिसांमुळे उधळले

सुराज्य/पंढरपूर

मिर्जापुर वेब सिरीज पाहून बंदुकीचा वापर करून डॉन बनण्याचे स्वप्न बाळगणाऱ्या धनाजी अटकळे रा. शेगाव दुमाला ता. पंढरपूर याला शहर पोलिसांनी अटक केली असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार पंढरपुरातील अंबाबाई पटांगण येथे आरोपी बंदूक घेऊन थांबला असल्याची गोपनीय माहिती पोलीस अंमलदार सूरज हेंबाडे यांना मिळाल्यानंतर त्यांनी धनाजी अटकळेला ताब्यात घेतल्यानंतर त्याच्याकडून एक गावठी बनावटीची बंदूक पोलिसांनी जप्त केली त्याच्याकडे अधिक तपास केला असता त्याने आणखीन एक बंदूक त्याच्याकडे असल्याचे तपासात निष्पन्न झाले दोन्ही बंदुका त्याने उत्तर प्रदेश मधील मित्र सहजराम वर्मा यांच्याकडून घेतले आहेत पोलिसांनी सहजराम वर्मा याला देखील अटक केली आहे. मिर्झापूर वेब सिरीज पाहून गावठी कट्टे भीमा नदीच्या काठी फायर करून हाताला इजा होते का ? नाही याचा देखील प्रयोग या दोघांनी केला आहे.

पंढरपूर तालुक्याचा भाई बनण्याचे स्वप्न अनेकांनी बाळगले आहे. हे स्वप्न बाळगताना अनेकजण गुन्हेगारी क्षेत्राकडे वळले आहेत. एक वेळ आपण पंढरपूरचे भाई बनू यासाठी उत्तर प्रदेश मधून दोन गावठी कट्टे या भाईने घेतले. त्याला आणि त्याच्या साथीदाराला पोलिसांनी अटक केली आहे.

## शुक्रवारपेठेत वृद्ध इसमाची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर** : समाचार चौक परिसरातील शुक्रवार पेठेत राहणाऱ्या एका ६४ वर्षीय इसमाने राहत्या धरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना सोमवारी दुपारच्या सुमारास उघडकीस आली.

भारत वसंत शिंदे (वय ६४ रा.शुक्रवार पेठ) असे मयत झालेल्या इसमाचे नाव आहे. त्यांचा शुक्रवार पेठत कुशन मेकरचा व्यवसाय आहे. दुपारच्या सुमारास घरात कोणी नसताना त्यांनी छताच्या लाकडी वाशाला दोरीच्या सहाय्याने गळफास घेतला होता. त्यांना फासातून सोडवून अनिल शिंदे (मुलगा) यांनी शासकिय रुग्णालयात दाखल केले असता ते उपचारापूर्वी मयत झाले.मयत भारत शिंदे यांच्या पश्चात दोन मुले आणि एक मुलगी असा परिवार आहे. या घटनेची नोंद जेल रोड पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. हवालदार कांबळे पुढील तपास करीत आहेत.

## मागील भांडणावरून दहशत माजवणाऱ्या १५ जणांविरुद्ध गुन्हे दाखल

सुराज्य/सोलापूर

रविवारी रात्री झालेल्या भांडणावरून पोटफाडीत चौकात तुफान दगडफेक करून दहशत माजवणाऱ्या १५ जणांनी विरुद्ध सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या १५ जणांपैकी सात जणांना पोलिसांनी ताब्यात घेतल्या असून, आज त्यांना न्यायालयात हजर करणार असल्याचे सदर बझार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राघवेंद्र क्षीरसागर यांनी सांगितले.


या घटनेची हकीकत अशी की, मित्रा-मित्रात वर्षभरापूर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून रविवारी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास पोटफाळी चौक येथे दगडफेक करून दोन दुचाकी गाड्यांची तोडफोड केली.तसेच एका मालवाहतूक गाडीची समोरील काच देखील फोडण्यात नुकसान केले.या घटनेत दोन जण जखमी झाले. लोखंडी सळई कोयता,काट्या याचा वापर करून मारहाण करत ही दगडफेक करण्यात आली.या घटनेची नोंद सदर बझार पोलिस ठाण्यात झाली असून,घटनेचा पुढील तपास पीएसआय माळी हे करीत आहेत.

## शमशापूर येथे आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर** : शमशापूर (ता.उत्तर सोलापूर) येथे राहणाऱ्या दीपाली बाळासाहेब खरात (वय २७) या विवाहितेने विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केली. रविवारी सायंकाळच्या सुमारास हा प्रकार घडला. तिला उपचारासाठी सविता माडकर (आई) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. पतीबरोबर भांडण झाल्याच्या कारणावरून तिने हा प्रकार केला. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आधी मी तुझ्यासारखाच होतो, नंतर राजकारणात आलो!!

कल्याण
266-44-130

मेन बाजार
377-76-367

## 'राधाश्री'वर रोहित पवारांची 'लंच डिप्लोमसी', राजकीय वर्तुळात खमंग चर्चा

सुराज्य/सोलापूर

राष्ट्रवादीचे सर्वेसर्व खा. शरद पवार यांच्यानंतर त्यांचे नातू आ. रोहित पवार यांनी माजी महापौर महेश कोठे यांच्या 'राधाश्री' निवासस्थावरच्या 'लंच' डिप्लोमासीमुळे वेगळ्या चर्चे ला उदानाला आहे. या बंद खोलीमध्ये मोजक्या लोकांच्या उपस्थितीमध्ये झालेली लंच डिप्लोमासीमध्ये कोणती राजकिय खलबत्ते झाली? नेमकी कोठे यांच्याकडून पवारांनी कोणाता राजीकिय आढावा घेतला? याची खमंग चर्चा सध्या राष्ट्रवादी वर्तुळात चालू आहे.



नगर जिल्ह्यातील कर्जत जामखेड मतदारसंघाचे राष्ट्रवादीचे आमदार तथा राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांचे नातू आणि यांचे राजकिय वारसदार मानले जाणारे आ. रोहित पवार यांनी सोलापूर जिल्ह्यावर लक्ष केंद्रित केले आहे. त्यांचा सोलापूर जिल्ह्यातील दौरे वाढले आहेत. सोमवारी शहरामध्ये अचानक दौरा झाला. या दौऱ्यामध्ये पवारांनी युवकांची संवाद साधला, क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्षपद असल्याने पार्क मैदानावर क्रिकेटचा आनंद घेतला त्यानंतर नियोजित दौऱ्यामध्ये कुठलेही नियोजन नसताना राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांना कुठलीही कल्पना न देता मोजक्याच विश्वासू पदाधिकाऱ्यांना घेऊन रोहित पवारांनी थेट माजी महापौर तथा राष्ट्रवादीचे नेते महेश कोठे यांचे मुरारजी पेठेतील राधाश्री निवासस्थान गाठले वास्तविक पाहता या भेटीला औपचारिक भेट असे गोंडस नाव दिले असले तरी या भेटीची कमालीची गुप्तता पाळण्यात आली होती. शहरातील पदाधिकाऱ्यांना देखील कुठलीच कल्पना नव्हती या भेटीत आ. पवारांनी महेश कोठे यांच्याबरोबर बंद खोलीत सुमारे दीड तास चर्चा करत लंच घेतल्याने या 'लंच डिप्लोमसी' मध्ये नेमकं काय घडले? याची खमंग चर्चा सध्या राष्ट्रवादीमध्ये चालू आहे. आ. रोहित पवार हे सध्या राज्यातील राजकारणावर लक्ष केंद्रित केले आहे. आगामी विधानसभा तसेच पालिका निवडणुकिच्या पार्श्वभूमीवर रोहित पवारांचा राजकारणामध्ये वाढलेला सक्रिय सहभाग सर्वच राजकिय नेत्यांच्या भुवया उंच करयला लावणाऱ्या आहेत. त्यामध्ये महेश कोठे यांच्या खांद्यावर आगामी पालिका निवडणूकीची जबाबादारी दिल्याने आ. रोहित पवार यांच्या भेटीचे गुढ वाढले आहे. राधाश्रींवर आलेल्या रोहित पवाराबरोबर राष्ट्रवादीचे नेते सुधीर खारटमल, बिजू प्रधाने माजी महापौर यू.एन. बेरिया यांच्यासह कोठे परिवारातील माजी नगरसेवक देवेंद्र कोठे, प्रथमेश कोठे आणि कोठे परिवारातील सदस्य उपस्थित होते.

सुरुवातीला पवारांनी शाकाहारी भोजनाचा आस्वाद घेतल्यानंतर कोठे परिवाराच्या वतीने रोहित पवार यांचा सत्कार करत स्वागत केले. त्यानंतर बंद खोलीत राजकिय खलबत्ते झाली. आगामी पालिका आणि विधानसभा निवडणुकि संदर्भात पवारांनी महेश कोठे यांच्याकडून कानोसा घेतला. कोठे यांनी पवारांना नेमके काय क सांगितले? याबबत कमालीची गुप्तता पाळली जात असल्याने या भेटीचे गुढ वाढले आहे. यासंदर्भात महेश कोठे यांना विचारणा केली असता माजी नगरसेवक प्रथमेश कोठे यांचा विवाह समारंभाला रोहित पवार यांना उपस्थित राहता आले नाही त्यामुळे ते प्रथमेश कोठे यांना भेटण्यासाठी आले होते.

यापुर्वी सुद्धा त्यांचा दौरा नियोजित होता त्यावेळी सुद्धा त्यांनी विचारणा केली होती. मात्र प्रथमेश कोठे परगावी असल्याने त्यांनी भेट झाली नाही सोमवारी त्यांनी राधाश्री निवासस्थानी येऊन कोठे परिवाराची भेट घेतली शाकाहारी भोजनाचा आस्वाद घेऊन प्रथमेश कोठे यांना शुभेच्छा दिल्या असल्याचे सांगण्यात आल. मात्र या 'लंच डिप्लोमसी'च्या पाठीमागून काही राजकिय खलबत्त झाल्याची चर्चा सध्या राष्ट्रवादीमध्ये खमंगपणे चालू असल्याचे बोलले जात आहे.

# कसब्यातील खदखद...

पुण्यातील कसबा विधानसभा मतदार संघाच्या पोटनिवडणुकीवरून पक्षांतर्गत राजकारण तापले. त्यावर पाणी मारून हा वणवा कसा शांत करायचा? हा एक गंभीर प्रश्न भाजप श्रेष्ठींपुढे उभा राहिला आहे. अति संयमपणा विस्फोटाला कारणीभूत ठरू शकतो. संयमालाही सीमा असते. कसब्यात ब्राह्मण समाजाकडून जे संतप्त पडसाद उमटले ते त्याचेच द्योतक म्हणता येईल. दिवंगत नेत्या मुक्ता टिळक यांच्या घरातील व्यक्तीला डावलून पुणे मनपा स्थायी समितीचे माजी सभापती हेमंत रासने यांना उमेदवारी दिल्यानंतर ज्या समाजाची निर्णायक मते आहेत, त्या ब्राह्मण समाजात संतापाची लाट उसळली आहे. रासनेंची उमेदवारी जाहीर झाल्यापासून ही खदखद होती. अखेर हिंदू महासंघाचे अध्यक्ष आनंद दवे यांच्या तोंडातून ही खदखद अखेर बाहेर पडली. दवे यांनी यासंदर्भात जो इशारा दिला आहे, तो भाजपची चिंता वाढवणारा नक्कीच आहे. या निवडणुकीत त्याचा कसा परिणाम होतोय हे दिसेल, अशा शब्दात दवे यांनी भाजपला ठणकावले. भाजपच्या प्रदेश पातळीवरून चुकीचे निर्णय घेतले जात आहेत. त्याचा दणका नुकत्याच झालेल्या पदवीधर व शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीत बसलाच. स्वकीयांना न्याय द्यायचे सोडून आयारामांना रेड कार्पेट घालण्याचे कारस्थान भाजपमध्ये पद्धतशीरपणे सुरू आहे.त्याबद्दलची चीड पक्षात वाढत आहे. नागपूरमध्ये भाजपचा उमेदवार असता तर आमचा विजय झाला असता हे भाजप प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे विधान बरेच काही सांगणारे आहे. पिंपरीमधून दिवंगत लक्ष्मण जगताप यांच्या जागी त्यांच्या पत्नी अश्विनी जगताप यांना उमेदवारी देण्यात आली. मात्र, कसब्यामध्ये मुक्ता टिळक यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबात उमेदवारी देण्याऐवजी रासने यांना उमेदवारी देण्यात आली आहे. जगताप घराण्याला जो न्याय दिला, तो टिळकांच्या घराला का दिला नाही? हा उपस्थित झालेला प्रश्न नैसर्गिक न्याय तत्त्वाला धरून असणार आहे. टिळकांना उमेदवारी नाकारली याचाच अर्थ ब्राह्मण समाजाला डावलले, असा आता जो अर्थ काढला जात आहे, त्यात गैर काय? कोथरूडनंतर कसब्याचा नंबर लागला आता बापटांचा क्रमांक आहे की काय? असाही प्रश्न समोर येणे साहजिकच आहे. आगीत तेल ओतणारा पक्षातील शुक्राचार्य कोण आहे, याचा शोध लागला पाहिजे. कसबा पोटनिवडणूक बिनविरोध करण्यासंदर्भात पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी ४८ तासांत उमेदवार बदलतो, निवडणूक बिनविरोध करणार का? असे आव्हान महाविकास आघाडीला दिले होते. त्यासंदर्भात बोलताना बावनकुळे यांनीही वेळ आहे, उमेदवार बदलता येईल, असे सांगत विरोधकांची कोंडी करण्याचा प्रयत्न केला. या दोघांची विधाने पाहाता ही कोंडी नव्हे तर कसब्यातील लोकांची चेष्टाच म्हणावी लागेल. महाविकास आघाडीचा उमेदवार नसेल तर टिळकांना उमेदवारी दिली जाईल, असे खुद्द बावनकुळेच म्हणत असतील तर प्रदेश अध्यक्ष म्हणून त्यांच्याकडे काही परिपक्वता आहे की नाही? भाजपच्या दृष्टीने कसब्याची जागा हक्काची असताना महाआघाडीकडे बोट कशासाठी करता? इतकं डरपोकपणा कशासाठी? उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व आपण टिळक वाड्यात जाऊन शैलेंद्र टिळक आणि कुणाल टिळक यांच्यासोबत चर्चा केली. त्यानंतर आम्ही उमेदवारीबाबत निर्णय घेतला. टिळकांच्या घरात महाविकास आघाडीने उमेदवारी दिली तर ही निवडणूक आम्ही बिनविरोध करू हे चंद्रकांतदादांचे विधान अत्यंत हास्यास्पद ठरते. पाटील यांनी टिळक कुटुंबातील व्यक्तीला उमेदवारी देण्याची मागणी केली होती. भाजपने टिळक कुटुंबाच्या विरोधात उमेदवार दिला आहे. राजकीय तज्ज्ञ म्हणतात की- भाजपने त्यांच्या पक्षातील ओबीसी नेत्यांची ताकद कमी केली होती. त्यामुळे आता त्यांना आणि मतदारांना खूश करण्यासाठी भाजपाने टिळक कुटुंबाला डावलून ओबीसी उमेदवाराला संधी दिली आहे. परंतु टिळक कुटुंबीयांना संधी देण्याची जबाबदारी भाजपाची आहे. ब्राह्मण समाजाचाच उमेदवार असावा असा अट्टाहास या समजाचा कधीच नसतो. जगतापांच्या घरात जसा न्याय दिला, तसाच न्याय टिळकांच्या घरातही करायला हवा होता. हा साधासुधा विषय आहे. ब्राह्मण समाजाने भाजपाच्या पडत्या काळात सर्वाधिक काम केले आहे हे सत्य कुणालाच नाकारता येणार नाही. पडत्या काळात पदरमोड करून या समाजातील नेत्यांनी निवडणुका लढवल्या व पराभव पचवला. हे आजच्या राजकारण्यांनी लक्षात ठेवायला हवे. आता सत्तेची फळे दिसून लागताच या समाजाला का डावलले जात आहे? भाजप हा ब्राह्मणांचा पक्ष आहे, अशी टीका विरोधकांकडून मध्यंतरी केली गेली. १९९५ ला युतीची सत्ता आल्यानंतर भाजपला बहुजन चेहरा देण्यासाठी म्हणून गोपीनाथरावांनी इतर पक्षांमधील बहुजन नेत्यांना पक्षात घेऊन खिरापतीप्रमाणे सत्तेची पदे दिली. १९९९मध्ये आघाडीची सत्ता आल्यानंतर या नेत्यांनी भाजपला ठेंगा दाखवला. हा इतिहास विसरताच येणार नाही.

शैक्षणिक

# आर्थिक मूल्यमापन काय सांगते?

सरकार आपल्या वार्षिक खर्चाच्या ८५ टक्के रक्कम वेतन, निवृत्तिवेतन, अनुदाने यावर खर्च करत असेल तर त्यातून नेमके काय निपजते याचे मूल्यमापनही व्हायला हवे. जुनी पेन्शन योजना लागू करायची अथवा नाही हा मुद्दा पुन्हा चर्चेत येत आहे. तेव्हा याबद्दल सामान्य माणसाने काय भूमिका घ्यावी हा प्रश्न असतो. शासनाचा एकूण वार्षिक खर्च साधारण रु. ५ लाख कोटी आहे. त्यातील रु. ४.२५ लाख कोटी, म्हणजेच ८५ टक्के हा चालू खर्च पगार, पेन्शन, अनुदान व विविध योजनांवर होतो. फक्त ७५ हजार कोटी, म्हणजेच १५ टक्के खर्च भांडवली असतो. यातून रस्ते, शाळा, बंधारे इत्यादींची निर्मिती होते. चालू खर्चापैकी १.७५ लाख कोटी पगार पेन्शनवर खर्च होतो.

महाराष्ट्राची लोकसंख्या १२ कोटी आहे आणि त्यातील कामगारांची संख्या साधारण ४-६ कोटी आहे. यात सरकारी कर्मचारी जवळपास ७-८ लाख आणि पेन्शनधारी ७ लाख लोक, असे १५ लाख, म्हणजे एकूण कामगारांच्या फक्त ३-५ टक्के शासनाच्या 'मस्टर' वर आहेत. हे ७-८ लाख शासकीय कर्मचारी आपल्याला वेगवेगळ्या सेवा पुरवितात ज्यालादेखील मूल्य असते. त्यामुळे वाढलेला पेन्शन खर्च योग्य आहे का याचे उत्तर या पदांच्या कार्यकक्षा आणि कर्मचाऱ्यांच्या कामाच्या मूल्यमापनावर आधारित आहे.

**प्राध्यापक, कार्यकक्षा, आजची परिस्थिती**

या लेखात आपण शासनात रुजू असलेल्या प्राध्यापक या पदाची चर्चा करणार आहोत. आज महाराष्ट्रात पदवी विद्यार्थ्यांची संख्या साधारण ३०-३५ लाख आहे. हे विद्यार्थी चार ते पाच हजार महाविद्यालयांमधून विद्याग्रहण करीत आहेत. यातील दोन हजार महाविद्यालयांना शासनाकडून अनुदान प्राप्त होते. शिक्षकांची संख्या ८० हजार ते एक लाख २० हजार आहे व त्यातील २० ते ३० हजार शिक्षक हे प्राध्यापक आहेत. त्यांचा सरासरी मासिक पगार किमान रु. १.५ लाख आहे आणि तो शासनाकडून येतो. बहुतांश शिक्षकांचे पद हंगामी असून त्यांचे मासिक वेतन फक्त रु. १८ हजार म्हणजेच 'पर्मनंट' प्राध्यापकांच्या केवळ १५ टक्के असते. शिक्षकांच्या या दोन श्रेण्यांच्या जबाबदाऱ्यांमध्ये फारसा फरक नसतो. किंबहुना हंगामी शिक्षक तरुण असतात आणि विद्यार्थ्यांबरोबर आणि महाविद्यालयाच्या विविध कार्यक्रमांमध्ये त्यांचा सहभाग जास्त असतो.



उच्च शिक्षणावर शासनाचा प्रत्येक विद्यार्थ्यांवर साधारण वार्षिक खर्च रु. ५५ हजार रुपये असतो व याचा मोठा भाग अध्यापकांच्या पगारावर होतो. त्यामुळे प्राध्यापक नेमके काय करतात आणि त्यांच्या पगारातून समाजाला काय मिळते हे आपण बघितले पाहिजे. आज महाराष्ट्राचा विचार केला तर, केंद्र शासनाच्या अहवालानुसार तरुण पदवीधरांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण ३० टक्के आहे. विद्यार्थ्यांचे शिक्षक किंवा शिक्षण पद्धतीबद्दल अभिप्राय आणि विश्लेषण याची परंपरा नाही. त्याहून मोठा मुद्दा आहे, समाजासाठी ज्ञान निर्मितीचा. उदाहरणार्थ आज रत्नागिरी जिल्ह्यात दरवर्षी साधारण २०० भूगोल आणि २०० अर्थशास्त्राचे नवीन पदवीधर कॉलेजातून बाहेर पडतात. यांच्यावर शासनाचा साधारण रु. ७ कोटी खर्च झालेला असतो. पण ते नेमके कुठे जातात आणि काय करतात याचे विश्लेषण सोडाच, माहितीदेखील आपली महाविद्यालये ठेवत नाही. पदवीधर म्हणून काय कौशल्ये असायला हवीत हेही कुठे नमूद नाही. अनेक प्रादेशिक प्रश्न अभ्यासाच्या प्रतिक्षेत आहेत व असे अभ्यास नवपदवीधरांसाठी उपजीविकेचे महत्त्वाचे साधन आहे. जवळपास सगळे एसटी डेपो तोट्यात आहेत. डेपो व तालुक्याचे एकत्रित विश्लेषण करून नवीन मार्ग सुचवणे, वेळापत्रकामध्ये बदल करणे इत्यादी कौशल्ये पदवीधरांमध्ये असायला हवी. पण त्याचा लवलेशही आपल्याला आढळत नाही.

यासाठी विद्यार्थ्यांचे अनुभवविश्व वाढवणे आणि त्यांच्याकडून छोटेखानी अभ्यास करून घेणे हे अभ्यासक्रमात असायला हवे. जिल्हास्तरावरच्या प्रश्नांवर संशोधन - उदा. स्थानिक उद्योग यांचे आर्थिक किंवा व्यवस्थापनाचे अहवाल, जिल्हा प्रशासनाला लागणारे सर्व्हे, शेती, पाणी, प्रदूषण याबद्दलची अद्ययावत माहिती - हे सर्व प्राध्यापकांच्या कार्यकक्षेत असते, पण तसे होताना दिसत नाही.

**विज्ञानाचे प्रवाह :** आज जी राष्ट्रे प्रगत आहेत, त्यात विज्ञानाचे अभ्यासाचे विषय व कार्यपद्धती अतिशय लोकाभिमुख आहेत. त्यासाठी शिक्षण संस्थांमधील प्राध्यापकांचे संशोधन व समाजाबरोबरचे संबंध हे अतिशय घनिष्ठ असतात. त्यामुळे युवा पिढीमध्येसुद्धा चौकस वृत्ती आणि सामाजिक जाणीव आपल्याला दिसून येते. नवीन उपक्रम किंवा उद्योग सुरू करण्यासाठी लागणारी बौद्धिक सामग्री आणि अनुभव त्यांच्यापाशी असतो. आपल्यासारख्या गरीब व विकसनशील देशासाठी विज्ञानाचा हा लोकाभिमुख प्रवाह फारच महत्त्वाचा आहे. अशाने पारंपरिक विषयांबरोबर चूल, पाणी, शेती, एसटी हे विषय जोडले जातात. आपोआप विज्ञानाचा विविध अंगी अभ्यास होतो, विद्यार्थ्यांचे कौशल्य वाढते आणि उपयुक्त ज्ञान निर्मिती होते.

खेदाची गोष्ट आहे की राष्ट्रीय ज्ञान-विज्ञान प्रणालीचा प्रवास उलट्या दिशेने चालू आहे. विज्ञानाचे व अभ्यासक्रमांचे केंद्रीकरण, प्राध्यापकांच्या बढतीच्या बदलत्या नियमावली, केंद्राचे क्षुल्लक गोष्टींबद्दल निर्देश अशा लाल-फितीत आपल्या शिक्षण संस्थांना अडकवण्यात आले आहे. जेईई, नीट, सीयूईटी यासारखी ब्रह्मास्त्रे युवा पिढीची स्फूर्ती, ध्येयवाद आणि पुरुषार्थाचे खच्चीकरण करीत आहेत. ही बाबूशाही कायम ठेवणे, परीक्षांचे नियोजन, त्यांची मान्यता आणि प्रतिष्ठा वाढवणे, ही कामे आपले प्राध्यापक कळत-नकळत करीत आहेत.

**उच्च शिक्षण, समाजव्यवस्था, विकास**

आपल्या उच्च शिक्षण प्रणालीची दुरवस्था माहीत असूनदेखील केंद्र किंवा राज्य प्रशासन यामध्ये मौलिक सुधारणा का घडवून आणत नाहीत? याचे उत्तर ऑक्सफॅमने काही दिवसांपूर्वी प्रकाशित केलेल्या अहवालात सापडते. आज आपल्या देशाची ४० टक्के संपत्ती वरच्या एक टक्का लोकांकडे आहे. खालचे ५० टक्के लोक मात्र ६८ टक्के जीएसटी भरत आहेत. या विषमतेची कारणेसुद्धा नवीन नाहीत. अर्थात याने मूळ विकासाचे प्रश्न आता खूप कठीण झाले आहेत. त्यात भर पडली आहे प्रदूषण आणि हवामान बदल या समस्यांची. त्याचबरोबर वाढत्या विषमतेमुळे सामूहिक उपाययोजना आखणे अजून कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत, प्राध्यापकांनी आत्मपरीक्षण करणे जरुरीचे आहे.

**- मिलिंद सोहोनी.**

टुडेज् ब्लॉग

# सामान्य घरातील युवतींची यशोगाथा

**भारतीय युवतींनी (१९ वर्षांखालील) क्रिकेट वर्ल्ड कप स्पर्धेत यशस्वी पदार्पण करताना जेतेपद हासील केले आणि संपूर्ण देशातून त्यांच्यावर स्तुतिसुमनांचा वर्षाव सुरू झाला. महिला क्रिकेट संघाला जगज्जेतेपदाने याआधी अनेकदा हुलकावणी दिली होती, पण दक्षिण आफ्रिकेतील ज्युनिअर वर्ल्ड कप स्पर्धेत जगज्जेतेपद पटकावण्याचा पराक्रम सर्वसामान्य घरातून आलेल्या युवतींनी केला हीच मोठी यशोगाथा. महिला क्रिकेटसाठी आगामी दिवस सुगीचे ठरतील. बहुचर्चित महिला क्रिकेट लीग (महिलांची आयपीएल) मार्च महिन्यात खेळली जाईल.**




पंतप्रधान नरेंद्र मोदींनी विजेत्या युवा संघाचे अभिनंदन केले. भारतीय क्रिकेट मंडळाने ५ कोटींचे इनाम जाहीर केले ते या अजिंक्य संघातील खेळाडू, प्रशिक्षक, सहाय्यक प्रशिक्षक, सपोर्ट स्टाफसहित साऱ्यांनाच त्यांच्या कामगिरीची केवळ दखल घेतली गेली असे नव्हे, तर कदरही केली गेली. 'भारतरत्न' सचिन तेंडुलकरच्या हस्ते या रणरागिणींचा गौरव करण्यात आला, ५ कोटींचा धनादेश देण्यात आला अन् सचिनसहीत बीसीसीआयचे अध्यक्ष तसेच माजी वर्ल्ड कप विजेते रॉजर बिन्नी उपाध्यक्ष राजीव शुक्ला तसेच चिटणीस जय शहादेखील या आनंदसोहळ्याला आवर्जून उपस्थित होते. हरयाणा, बंगाल, पंजाब, उत्तर प्रदेश या क्रिकेटेत्तर खेळासाठी प्रसिद्ध असलेल्या राज्यातून आर्थिक तंगीचा मुकाबला करत राष्ट्रीय संघात स्थान मिळवण्यासाठी या मुलींनी कडवा संघर्ष केला शिवाय यांच्या पालकांना (माता, बंधू भगिनी) यांना टीका टिप्पणी टोमणे तसेच कुत्सित शेरेबाजीला सामोरे जावे लागले, ही बाब नजरेआड करून चालणार नाही.

आणखी एक बाब प्रकर्षाने नमूद करण्याजोगी आहे ती म्हणजे याचदरम्यान मायदेशी ओडिशा राज्यात भुवनेश्वर आणि राऊरकेला येथील भव्यदिव्य स्टेडियमवर वर्ल्ड कप हॉकी स्पर्धा खेळली जात होती, पण (यात यजमान भारतीय संघाची नवव्या क्रमांकावर घसरण झाली) प्रसारमाध्यमांनी भारतीय युवतींच्या भीमपराक्रमाची दखल घेत फ्रंट पेजवर सचित्र बातमी छान मथळे देत सजवली आणि तमाम क्रीडारसिकांनी याची दखल घेतली आणि त्यांच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव करण्यात आला

देशाच्या सिनियर संघाची मजबुती ही जुनियर संघाच्या ताकदीवर अवलंबून असते तसेच त्याचा भविष्यकाळदेखील उज्ज्वल असतो असे म्हटले तर वावगे ठरू नये. भारतीय युवतींनी (१९ वर्षांखालील) वर्ल्ड कप जिंकला अन् आता लवकरच (१० ते २६ फेब्रुवारी) दक्षिण आफ्रिकेतच महिला वर्ल्ड कप क्रिकेट स्पर्धेला सुरुवात होतेय हा भारतासाठी शुभशकुन ठरावा. शफाली वर्मा तर युवा संघाची कर्णधार होती. तिने आपल्या साऱ्या नवोदित सहकाऱ्यांच्या साथीने वर्ल्ड कप हस्तगत केला. शफाली तर अनुभवसमृद्ध अशी खेळाडू आणि तीच शफाली आता सिनियर भारतीय संघातून खेळेल तिचा ताजा अनुभव हरमनप्रीतच्या संघाला निश्चितच फलदायी ठरेल, अशी अपेक्षा आहे.

भारतीय क्रिकेटचा पाया मजबूत आहे. ज्याप्रकारे विविध स्तरांवर मुला-मुलींसाठी विविध वयोगटातील स्पर्धा घेतल्या जातात त्याच अखिल भारतीय स्तरावर मोठे जाळे पसरलेले आहे. त्याची व्याप्ती मोठी आहे. विविध सामाजिक घटकातून खेळाडू पुढे येताहेत तेदेखील परिस्थितीचा नेटाने मुकाबला करूनच. ज्युनिअर पातळीवर खेळताना त्याचा भार पडतो पालकांवरच. मुंबई, दिल्ली, चेन्नई, बंगळुरू, कोलकाता यासारख्या महानगरात शाळा, कॉलेज, क्लब, प्रशिक्षक या सोयी सुविधा थोड्या फार प्रमाणात का होईना उपलब्ध असतात, पण महानगरातील खर्चदेखील अफाट, सर्वसामान्यांच्या खिशाला परवडेल असे काही नाही. मग ग्रामीण भागातून धडपड करत पुढे येणाऱ्या उमलत्या कळ्यांना जपून पुढे वाटचाल करणे कर्मकठीण बाब. काटेरी वाटचाल करून बहुतेक साऱ्याजणी (एखाददुसरा अपवाद असू शकेल) राष्ट्रीय संघात प्रवेश मिळवून पहिल्यावहिल्या वर्ल्ड कप स्पर्धेत जेतेपद पटकावतात ही स्वप्नवत कामगिरी म्हणायला हवी.


खेळ मग तो कोणताही असो त्यात आशा, निराशा, हर्ष, खेद, अन्याय, वैफल्य, स्वप्नपूर्ती, स्वप्नभंग या गोष्टी अटळ आहेत. गुणवत्तेला यशस्वी कृतीची जोड लाभली की त्याला इनाम देऊन गुणगौरव करणेदेखील योग्य, त्याची दखल योग्य वेळी घेतली गेली तर दुग्धशर्करा योग म्हणायला हवा. दक्षिण आफ्रिकेत तो घडवून आणला तो रोहटकच्या शफाली वर्मा आणि तिच्या ताज्या दमाच्या साथीदार युवतींनी.

भारतीय क्रिकेट मंडळाने महिला आणि पुरुष क्रिकेटपटूंच्या मानधनात समानता आणली, पण ते फक्त आंतरराष्ट्रीय सामन्यासाठीच काही निवडक खेळाडूंनाच यात संधी लाभते. सर्वसामान्य महिला क्रिकेटपटू ज्या राष्ट्रीय स्पर्धेत खेळतात त्याबाबत पुरुष आणि महिला यांच्या मानधनात प्रचंड तफावत आढळून येते. देशांतर्गत (डोमेस्टिक) होणाऱ्या स्पर्धेत अनेक महिला क्रिकेटपटू सहभागी होतात, त्यांच्यात गुणवत्ता आहे, पण या स्पर्धांमध्ये खेळणाऱ्या खेळाडूंचे मानधन वाढले तर अनेक खेळाडू क्रिकेटकडे आकर्षित होतील. मानधनात वृद्धी झाली तर समाजात या खेळाडूंना मान मरातब लाभेल.महिला क्रिकेटला सुगीचे दिवस येवोत हीच सदिच्छा.

**- शरद कद्रेकर.**

जन्म हा अखेरचा

## भावाचारस्थल - १



तर येऊ दे. मागितल्यावर याच्या कामना पूर्ण होतील आणि कधीतरी कामना संपून हा निष्काम होईल. ज्यात काहीतरी कामना असते त्याला 'काम्यकर्म' म्हणतात.

चौथे कर्म 'प्रायश्चित्त कर्म' होय. आपल्या हातून निषिद्ध कर्म घडल्यावर त्याच्या परिमार्जनासाठी जे कर्म केले जाते ते प्रायश्चित्त कर्म होय. शास्त्रात अनेक प्रायश्चित्ते सांगितली आहेत. त्यात साधारण प्रायश्चित्त आणि असाधारण प्रायश्चित्त असे दोन भाग पडतात. मनुष्याकडून पापकर्म घडल्यानंतर त्याच्या परिमार्जनासाठी जे विशेष प्रायश्चित्त आचरावे लागते, त्याला 'असाधारण प्रायश्चित्त' म्हणतात. या प्रायश्चित्ताने त्या विशिष्ट पापांचेच परिमार्जन होते, दुसऱ्या पापकर्माचे होत नाही. जन्मजन्मांतरात मनुष्याकडून जी पापकर्म घडतात आणि ज्यांची त्याला जाणीवदेखील नसते अशा पापकर्मांच्या परिमार्जनासाठी घेतले जाणारे प्रायश्चित्त म्हणजे 'साधारण प्रायश्चित्त कर्म' होय. सर्व दुष्कृत्यांच्या परिमार्जनासाठी, एखाद्या ब्रह्मास्त्रासारखे हे प्रायश्चित्त कर्म आहे. पवित्र नद्यांत स्नान करणे, तीर्थक्षेत्रांतील देवतांचे पूजन करणे इत्यादी कर्मांना साधारण प्रायश्चित्त कर्म म्हटले जाते. मनुष्याने कोणतीही कर्मे केली नाहीत तरी त्याला नित्यकर्मे आणि नैमित्तिक कर्मे करावीच लागतात. ती कर्मे करताना मनुष्याची भावना कशी असावी, याबद्दल या श्लोकात सांगितले आहे. कुठलीही अपेक्षा न ठेवता केवळ शिवकृपा व्हावी म्हणून नित्यनैमित्तिक कर्मे करावीत. **(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

# सामाजिक बांधिलकीचा आदर्श

जनमानस

समाजातील विविध घटकांमध्ये डॉक्टरांना मानाचे स्थान आहे. आज ॲलोपॅथीला मोठे महत्त्व असले तरी आयुर्वेदाला तेवढाच मान समाजाकडून दिला जातो. डॉक्टरांचा समाजाशी दररोज संबंध येतो. आजार घेऊन येणाऱ्या रुग्णांना डॉक्टर बरे करत असतात. त्यामुळे 'रुग्णसेवा हीच ईशसेवा' असे ब्रीद वैद्यकीय शास्त्रात सांगितले जाते. त्यामुळे डॉक्टरांनी सामाजिक बांधिलकीचा आदर्श जोपासला पाहिजे, असे विचारवंत सांगत असतात. मोहोळ तालुक्यातील नरखेडचे युवा डॉक्टर राज वसंतराव लवंगे यांनी समाजकार्यातून हा आदर्श जोपासला आहे. त्यांच्या घराण्यात वैद्यकीय परंपरा आहे. वैद्य ग. म. लवंगे हे आयुर्वेदातील निष्णात डॉक्टर होते. त्यांची परंपरा डॉ. वसंतराव लवंगे व त्यांचे सुपुत्र डॉ. राज यांनी पुढे सुरु केली आहे. वैद्य ग. म. लवंगे यांच्या स्मरणार्थ माघी वारी निमित्त नरखेड येथे नुकतेच आरोग्य शिबिर घेण्यात आले. चारही मोठ्या एकादशींना मराठवाडा व विदर्भातून शेकडो पायी दिंड्या नरखेडमधून पंढरपूरला जात असतात. वारकऱ्यांच्या विचार करुन डॉ. राज यांनी नरखेड येथे वारकऱ्यांच्या आरोग्य शिबिर उपक्रमाचा आरंभ केला. गेल्या अनेक वर्षांपासून हा उपक्रम सुरु आहे.



नरखेडच्या श्री सिद्धेश्वर मंदिरात वारकरी मुक्काम करीत असतात. माघी वारीच्या निमित्ताने औसा येथील वीरनाथ मल्लिनाथ महाराज संस्थानच्यावतीने हभप गहिनीनाथ औसेकर महाराज यांच्या नेतृत्वाखालील औश्याहून पंढरीकडे निघालेल्या पायी दिंडीचे नरखेडमध्ये स्वागत करण्यात आले. डॉ. राज यांनी स्थापन केलेल्या 'स्नेहबंध' फाऊंडेशनच्यावतीने आरोग्यकक्ष स्थापन केले होते. त्याचे उद्‌घाटन गहिनीनाथ महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सुमारे हजार वारकऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली व त्यांना मोफत औषधे देण्यात आली. डॉ. राज हे पुण्यातील वैद्यकीय असोसिएशनचे अध्यक्ष असून तेथून औषधे आणून वारकऱ्यांना मोफत देत असतात. या उपक्रमाचे सर्वत्र स्वागत होत असते. आपला स्वत:चा व्याप सांभाळून डॉ. राज हे ही सेवा करीत असतात. याचबरोबर दरवर्षी नेत्रतपासणी शिबिर घेतली जाते. या आपल्या उपक्रमाविषयी ते म्हणतात, 'जनसेवा हीच ईश्वरसेवा आहे. वारकऱ्यांची सेवा करणे, माझे आद्य कर्तव्य आहे. या सेवेने मला ईश्वरी सेवेचा आनंद मिळतो.' डॉ. राज यांना कुटुंबाप्रमाणे वारकऱ्यांविषयी आस्था आहे.

**- सदाशिव ताबे, टेंभुर्णी.**

# गौरव करण्यात महाराष्ट्राकडून उपेक्षा

'हमको मन की शक्ती देना' या प्रार्थनागीताने त्यांची ओळख घराघरांत पोहोचली आणि वाणी जयराम हे नाव झळकायला लागले.

'गुड्डी' चित्रपटातील 'बोल रे पपीहरा' हे गीत गाणाऱ्या किंवा पं. कुमार गंधर्व यांच्यासारख्या दिग्गजाबरोबर गायलेले 'ऋणानुबंधाच्या जिथून पडल्या गाठी' हे भावगीत गाणाऱ्या कलावती एवढी ओळखही पुरेशी असणाऱ्या वाणी जयराम यांनी भारतीय चित्रपट आणि ललित संगीताच्या क्षेत्रात केलेले काम सहसा कुणाच्या लक्षात येत नाही. परंतु आपल्या आवाजाने अतिशय स्पर्धेच्या जगातही स्वतंत्र ओळख निर्माण करणारी गायिका म्हणून त्यांचे नाव घ्यावेच लागेल. विवाहानंतर मुंबईत येऊन स्थायिक झाल्यानंतर हिंदी चित्रपटांच्या दुनियेला आवाजाच्या एका नव्या पोताची ओळख झाली. ज्या संगीतकारांना ते समजून आले, अशा वसंत देसाई यांच्यासारख्यांनी त्याचा अतिशय सुंदर उपयोग करून घेतला.

'हमको मन की शक्ती देना' या प्रार्थनागीताने त्यांची ओळख घराघरांत पोहोचली आणि वाणी जयराम हे नाव झळकायला लागले.

पतियाळा घराण्याची रीतसर तालीम घेऊनही त्यांनी ललित संगीताची वाट धरली आणि त्यामध्ये तेलुगू, तमिळ, मल्याळम, कन्नड या भाषांतील सुमारे एक हजार चित्रपटांसाठी पार्श्वगायन केले. तेथील त्यांची कामगिरी अतिशय लक्षणीय ठरली, याचे भान मराठी रसिकांना असणे शक्य नसले तरी त्यांनाही, भावगीताच्या विश्वात रममाण करण्याचे काम वाणी जयराम यांनी केलेच. एकोणीस भाषांमध्ये गायलेली दहा हजारांहून



अधिक चित्रपट गीते, हजारो भक्तिगीते, स्वतंत्रपणे गायलेली गीते, सर्वोत्कृष्ट गायनासाठी तीन वेळा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार, आंध्रप्रदेश, ओडिशा, तमिळनाडू आणि गुजरात या राज्यांचे पुरस्कार आणि २०१७मध्ये 'नाफा'चा न्यूयॉर्कमध्ये मिळालेला सन्मान, अशी त्यांची देदीप्यमान कारकिर्द. मुंबईत वास्तव्यास असूनही महाराष्ट्राने त्यांना जाहीरपणे गौरविण्यात कसूरच केली. तमिळनाडूत जन्मलेल्या वाणी जयराम यांना लहान वयातच मुथुस्वामी दीक्षितार यांच्या रचनांचे आणि नंतर कर्नाटक संगीताचे रीतसर शिक्षण मिळाले.

विवाहानंतर त्या मुंबईत वास्तव्यास आल्या आणि त्यांनी पतियाळा घराण्याची तालीम घेतली. सुरेल गळ्याबरोबरच भाव व्यक्त करण्याची त्यांची शैली लक्षात राहणारी ठरली. संगीतातून आपले मन कसे व्यक्त करता येते, याचा तो एक वस्तुपाठच ठरला. मराठीमध्ये त्यांनी गायलेल्या गीतांची संख्या डझनभर असेल. 'उठा उठा हो सूर्यनारायण', 'सुखाचे हे सुख श्रीहरी', 'टप टप पडती अंगावरती' यासारख्या गाण्यांनी त्यांची ओळख अधिक गडद झाली. मात्र दक्षिणेतील भाषांमध्ये त्यांचा जेवढा बोलबाला झाला, तेवढा उत्तरेत झाला नाही, हेही खरे. 'पाकीजा' चित्रपटातील नौशाद यांची संगीत रचना असो की मदनमोहन यांच्या 'एक मुठ्ठी आसमान' या चित्रपटातील किशोर कुमार यांच्याबरोबरचे युगुल गीत किंवा ओ. पी. नय्यर आणि जयदेव यांच्यासारख्या संगीतकारांच्या रचना असोत, वाणी जयराम यांनी त्या प्रत्येक गीताला न्याय दिला.

पं. रविशंकर यांच्यासारख्या तरल कलावंतालाही 'मीरा' या चित्रपटासाठी 'मेरे तो गिरधर गोपाल' या गीताबरोबरच बारा भजने वाणी जयराम यांच्याकडून गाऊन घेण्याचा मोह झाला, यातच त्यांच्या श्रेष्ठतेचे गमक दडलेले आहे.

गेल्याच आठवड्यात त्यांना मिळालेल्या 'पद्म' पुरस्काराने आनंदित झालेल्या त्यांच्या चाहत्यांसाठी, त्यानंतर लगेच झालेले त्यांचे निधन ही एक अतिशय वेदनादायी घटना ठरते.

**- शुभांगी बेलसरे, पुणे.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# रस्त्यात खड्डे का खड्ड्यात रस्ते?

## सोलापूरची जनता...
# माणसे आहेत का जनावरे?

## एका सोलापूरकराने रस्त्याची समस्या फलकाद्वारे टांगली वेशीवर

✔ सुराज्य/सोलापूर

**सन्माननीय महानगरपालिका अधिकारी व संबंधित सर्व नेतेमंडळी तुमच्या नजरेत सोलापूरची जनता माणसं आहेत का जनावर? रस्त्यात खड्डे का खड्ड्यात रस्ते? सोलापूरची अशी दुर्दशा असणे, ही लाजीरवाणी बाब...! – एक सोलापूरकर अशा आशयाचा भव्य डिजिटल फलक कुंभार वेस येथे लावण्यात आला. हा फलक सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. आता प्रशासन काय कार्यवाही करणार याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.**

गजबजलेल्या कुंभार वेस परिसरात हा डिजिटल फलक झळकत आहे. शहरातील रस्त्याच्या दरूस्तीच प्रश्न डिजिटलद्वारे वेशीवर टांगण्याचा प्रयत्न एका सोलापूरकराने केला आहे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत असताना दुसरीकडे सोलापूर शहराची विविध समस्यांमुळे झालेली दुर्दशा याकडे लक्ष वेधले आहे. व्हीआयपी लोक जिथे फिरतात तोच रस्ता पुन्हा पुन्हा केला जातो मात्र शहरातील अंतर्गत रस्त्याकडे महापालिकेचे दुर्लक्ष होत आहे. सोलापूरची जनता माणसं आहेत की जनावर असा सवालही या फलकाद्वारे उपस्थित केला आहे.

### त्या डिजिटल फलकावर असा आहे मजकूर...

आपण ७५ वा स्वातंत्र्य दिन व ७४ वा प्रजासत्ताक दिन साजरा करत असताना सोलापूरची अशी दुर्दशा असणे, ही लाजीरवाणी बाब... ! सन्माननीय महानगरपालिका अधिकारी व संबंधित सर्व नेते मंडळी तुमच्या नजरेत सोलापूरची जनता माणसं आहेत का जनावरं ?

### रस्त्यात खड्डे का खड्ड्यात रस्ते ?

तुळजापूर वेस ते कुंभार वेस ते कोंतम चौक, कुंभार वेस ते चाटला चौक, कुंभार वेस ते जोडभावी पेठ या रस्त्यावर इतकी हजारोंच्या संख्येने रहदारी असते. हा रस्ता ३ ते ४ वर्षापासून अतिशय खराब झाला आहे. या रस्त्याकडे ना महापालिकेचे ना कुठल्याही पुढाऱ्याचे लक्ष आहे. फक्त व्ही.आय.पी जेथे फिरतात तेथील रस्ते वरचेवर दुरुस्त केले जातात. बाकीची जनता ही जनावर आहेत का?

– एक सोलापूरकर

### प्रशासन व मक्तेदार रस्ते करत नाही : पाटील

**हा रस्ता मंजूर आहे. प्रशासन व मक्तेदार रस्ते करत नाहीत व मक्तेदार व संबंधित अधिकारी तसेच खातेप्रमुखांवर कारवाई होणे आवश्यक आहे. पालकमंत्री विखे–पाटील, आ. सचिन कल्याणशेट्टी आमदार देशमुख यांच्यामुळे रस्ता मंजूर झाला आहे. मात्र प्रशासन व मक्तेदार रस्ते करत नसल्याने सर्व व्यापाऱ्यांना याचा त्रास होत आहे, असे या भागातील माजी नगरसेवक सुरेश पाटील यांनी सांगितले.**






## ‘हे सावळ्या विठ्ठला’ पुस्तकाचे भक्तीमय वातावरणात प्रकाशन

✔ **दक्षिण सोलापूर** : भंडारकवठे येथील साधना कुटी सत्संग मंडळाचे संस्थापक विजय बिज्जरगी यांनी लिहिलेल्या हे सावळ्या विठ्ठला या भक्तीगीत पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच करण्यात आले.भारत पौर्णिमेनिमित्त आयोजित केलेल्या सत्संग सोहळ्यात ह.भ.प.सुधाकर इंगळे महाराज यांच्या हस्ते व विजयपूर येथील ज्ञानयोगाश्रमचे प.पू.अमृतानंद स्वामीजी यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. वंशपरंपरागत चालत आलेली बिज्जरगी घराण्यातील श्री पांडुरंगाची भक्ती आता या पुस्तकाच्या रूपाने साकार झाल्याचे प्रतिपादन इंगळे यांनी यावेळी बोलताना केले.या पुस्तकातील प्रत्येक रचना वाचनीय असून बिज्जरगी यांनी श्रीविठ्ठलावरचे प्रेम या काव्यातून प्रकट केल्याचे मत अमृतानंद स्वामी यांनी व्यक्त केले. प्रास्तविक बिज्जरगी यांनी केले. या काव्याचे स्फूरण कसे झाले?भगवंतांची प्रेरणा कशी मिळाली?याविषयीचे कथन त्यांनी केले.या कार्यक्रमास कंदलगावचे आनंदराव कोले,निंबर्गीचे शंकर पाटील,सरपंच चिदानंद कोटगोंडे,विठ्ठल पाटील,बाळकृष्ण महाराज नंदेश्वर,गणेशानंद महाराज, ज्ञानानंद स्वामी,बाजार समितीचे संचालक वसंत पाटील,माजी सरपंच रमेश पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.जीवन विकास प्रशालेचे मुख्याध्यापक एस.एम.नदाफ यांनी पुस्तकाचा परिचय करून दिला. पी.जी.हडपद यांनी सूत्रसंचालन केले.प.पू.स्व.सिद्धेश्वर स्वामी यांनी कुटीमध्ये लावलेल्या वृक्षापुढे आरती करून कार्यक्रमाची सांगता झाली.



## माने बँकेच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल मुजावर यांचा सत्कार

✔ **सोलापूर** : ब्रह्मदेवदादा माने बँकेचे नूतन संचालक शब्बीर मुजावर यांचा बँकेचे संचालकपदी निवड झाल्याबद्दल बँकेचे सर्वेसर्वा माजी आमदार दिलीप माने यांनी सत्कार केला. भाषणातून मुजावर यांनी बँकेच्या प्रगतीत मनापासून काम करीन असे सांगितले. या प्रसंगी नूतन चेअरमन लिंबीतोटे, व्हाईस चेअरमन दिगंबर, माजी सभापती केंगार, संचालिका माधवी उप्पीन, संचालक विशाल गवळी, संचालक नाना पवार, संचालक साखरे, तानाजी शिंगारे, बँकेचे जनरल मॅनेजर कुलकर्णी, माळवतकर उपस्थित होते.

## ‘श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज की जय’च्या जयघोषात गुलाल कार्यक्रम

### भाविकांची प्रचंड गर्दी

✔ सुराज्य/सोलापूर

’श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज की जय, जय जय रघुवीर समर्थ’ च्या जयघोषात सोमवारी श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज पुण्यतिथीनिमित्त गुलाल कार्यक्रम भक्तिमय वातावरणात झाला. यावेळी श्री प्रभाकर स्वामी महाराज मंदिरात भाविकांची दर्शनासाठी प्रचंड गर्दी झाली होती.

श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त सुरु असलेल्या अखंड नामजप सप्ताह, श्री गुरुगीता पारायणाची समाप्ती झाली. भक्तांच्या कल्याणासाठी अभिषेक आणि तर्पण विधी ट्रस्टी उदय वैद्य यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच महानैवेद्य, महाआरती करण्यात आली.



सायंकाळी गायक ज्ञानेश्वर वाघमारे यांचा भजनसंध्या कार्यक्रम झाला. यानंतर प्रकाश कोथिंबीरे आणि दत्तात्रय कुसेकर यांच्या अधिपत्याखाली सांप्रदायिक भजन झाले. यानंतर गुलालाचा कार्यक्रम झाला. दर्शनासाठी, नामजपासाठी भाविकांची मंदिरात गर्दी होती. ट्रस्टचे चीफ ट्रस्टी दत्तात्रय देशमुख, मॅनेजिंग ट्रस्टी बाळकृष्ण शिंगाडे, ट्रस्टी उदय वैद्य वसंत बंडगर, ट्रस्टी सदस्य वामन वाघचौरे, मोहन बोड्डू, रवी गुंड, सम्राट राऊत, रमेश देशमुख, रामभाऊ कटकधोंड, प्रभाकर कुलकर्णी, सुभाष बद्दूरकर, प्रकाश कोथिंबीरे, व्यवस्थापक निरंजन दंतकाळे आदी उपस्थित होते.

### लाडू प्रसाद वाटप

आज मंगळवारी (दि. ७) रोजी दुपारी १२ वाजता हजारो भाविकांना लाडू प्रसादाचे वाटप पोलीस उपायुक्त (परिमंडळ) विजय कबाडे त्यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी भाविकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज मंदिर ट्रस्टतर्फे करण्यात आले.

## आर.एस. मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने दीपोत्सवाचे आयोजन

✔ सुराज्य/सोलापूर



आ. एस. मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने माता रमाबाई आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त मंगळवार दिनांक ७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी साडेसहा वाजता न्यू बुधवार पेठ येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर उद्यानात दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष रवींद्र सरवदे यांनी दिली. याबाबत अधिक माहिती देताना सरवदे म्हणाले की, आई रमाईचा त्याग अवर्णनीय आहे. त्याला शब्दात मांडणे शक्य नाही. स्वत: झिजून रमाईने आपणा सर्वांना मायेची सावली दिली. भारत देश जो उभा आहे, तो आई रमाईच्या असीम त्यागामुळे आहे. भारतीय संविधानामुळे आपल्यालाजगण्यासाठी मोकळा श्वास मिळाला व हा श्वास मिळवून देणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे फक्त आई रमाईमुळेच घडले. त्यांच्या कार्याला एक अभिवादन म्हणून मंगळवारी सांयकाळी एक दिवा त्यागाचा या उपक्रमांतर्गत दीपोत्सवाचे आयोजन केले आहे. तरी समाज बांधवांनी यावेळी उपस्थित राहावे असे आवाहन रवींद्र सरवदे यांनी केले आहे.

## आजोबांच्या कार्यस्थळाला भेट देण्यासाठी इंग्लंडहून सोलापूरला नात आली

### डफरिन हॉस्पिटलला भेट देत आठवणीला दिला उजाळा!

✔ सुराज्य/सोलापूर

आजोबांचे कार्यस्थळ असलेल्या सोलापुरातील डफरीन हॉस्पिटलला इंग्लंडहून थेट सोलापुरात येऊन नातीने आपल्या आजोबांच्या आठवणींना उजाळा देत समाधान व्यक्त केले. ब्रिटिश काळात १८८४ मध्ये लेडी डफरीन हॉस्पिटलमध्ये सिव्हील सर्जन म्हणून आजोबानी काम केले होते. दरम्यान, १४० वर्षांनंतरही तो ऋणानुबंध आज नातीने हॉस्पिटलला भेट देऊन जपल्याचे दिसून आले.

ब्रिटिश काळात १८८४ ते १८८६ दरम्यान सिव्हिल सर्जन म्हणून डॉ. विल्यम स्क्रोजी हे तत्कालीन लेडी डफरीन हॉस्पिटलमध्ये कार्यरत होते. या काळात त्यांनी अनेक रुग्णांची सेवा केली होती. यादरम्यान डॉक्टर विल्यम स्क्रोजी यांना सोलापुरात दोन अपत्य झाले होते. दि. २३ जुलै १८८४ मध्ये त्यांना पहिले अपत्य व्लाउड स्क्रोजी हे तर त्यानंतर १२ जुलै १८८६ मध्ये दुसरे आपत्य रिथ स्क्रोजी यांचा जन्म झाला होता. यानंतर विल्यम हे आपल्या परिवारासह पुन्हा इंग्लंडला स्थायिक झाले. दरम्यान, डॉक्टर विल्यम यांची नात हेलन काईट (निवृत्त नर्स, वय ६५,) यांना आपल्या आजोबाच्या सोलापुरातील कार्यस्थळ असलेल्या डफरीन हॉस्पिटलची आणि त्यांनी केलेल्या कार्याची माहिती मिळाली. त्या माहितीच्या आधारे त्या सोलापुरात आल्या. नात हेलन काईट या इंग्लंडमध्ये निवृत्त नर्स आहेत. सोलपुरातील डफरीन हॉस्पिटलचे ठिकाण दर्शवणारा नकाशा व तत्कालीन तारखाच्या माहितीसह सोलापुरात आल्या. सोलापूर महापालिकेत येऊन डफरीन हॉस्पिटल संदर्भात माहिती घेतली आणि आज सोमवारी दुपारी त्यांनी हॉस्पिटलला प्रत्यक्ष भेट दिली आणि आजोबांच्या आठवणींना उजाळा दिला. हेलन काईट यांच्या समवेत इंग्लंड मधील निवृत्त शिक्षिका आन अंडरहिल आल्या होत्या. यावेळी डफरीन हॉस्पिटल मधील डॉक्टर मीनल चिडगुपकर यांनी त्यांना नूतनीकृत प्रसूती गृहाची माहिती दिली. यावेळी मेट्रन रेश्मा तडफदार, आरोग्य विभागाचे शहर लेखा व्यवस्थापक सिद्धेश्वर बोरगे आदींसह कर्मचारी उपस्थित होते.



### आजोबांनी काम केलेल्या भूमीला भेट दिल्याचे समाधान : काइट

१४० वर्षांपूर्वी डॉक्टर आजोबांनी ज्या ठिकाणी काम केले त्या भूमीला भेट दिल्याचे समाधान नात हेलन काइट यांनी व्यक्त केले. इंग्लंडमधील संस्थाकडून सोलापूरच्या डफरीन हॉस्पिटलसाठी काही मदत देता आली तर प्रयत्न करणार आहे, अशी ग्वाही हेलन काइट यांनी दिली.

### इंद्रभुवनच्या इमारतीचे केले कौतूक

सोलापूर भेटी दरम्यान इंग्लंडच्या निवृत्त नर्स हेलन काईट आणि निवृत्त शिक्षिका आन अंडरहिल यांनी महापालिकेत येऊन इंद्रभुवनच्या हेरिटेज इमारत पाहिली. एवढी मोठी जुनी आणि भव्य इमारत पाहून त्यांनी या इमारतीचे कौतुक केले.

## निधन वृत्त

### साधना पाटील

✔ **अक्कलकोट** : चपळगाव (ता.अक्कलकोट) येथील श्रीमती साधना रमेश पाटील (वय ६५ वर्षे)यांचे आज दुपारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुली,मुलगा असा परिवार आहे. त्यांच्यावर चपळगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. शरण उर्फ तम्मा पाटील यांच्या त्या मातोश्री होत.



### दिगंबर गोरे

✔ **सोलापूर** : दमानी नगर परिसरातील डीसीसी बँकचे सेवानिवृत्त कर्मचारी दिगंबर भागवत गोरे यांचे सोमवारी निधन झाले. ते मृत्यूसमयी ८४ वर्षाचे होते.त्यांच्या पश्चात एक मुलगा सून आणि नातवंडे असा परिवार आहे. सिव्हिल हॉस्पिटल मधील कर्मचारी संजय गोरे यांचे ते वडील होते.



## नीरा देवघर संघर्ष समितीने केला खा. रणजितसिंह निंबाळकर यांचा सत्कार



✔ सुराज्य/पिलीव

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी इंग्रजाप्रमाणे माढा मतदार संघातील निरा देवधरचे पाणीच नाही तर फलटण- पंढरपुर रेल्वेहि पळवली अशी जहरी टिका खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी नातेपूते येथे नागरी सत्कारास उत्तर देताना केली. परंतु काळजी करू नका मूख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमूख्यमंत्री देंवेद्र फडणवीस या मतदार संघाला काहीही कमी पडू देणार नाहित, अशी हमी देतो असे खासदार निंबाळकर म्हणाले.

खासदार निबांळकर यांच्यामूळे निरा-देवधर कॅनॉलच्या कामासाठी ३९७६ कोटी तर फलटण पंढरपुर रेल्वे मार्गासाठी ९२१ कोटी शासनाकडून मंजूर करूण आणल्याबद्दल माळशिरस तालूका भाजप, नातेपुते शहर भाजप, निरा देवधर संघर्षसमितीच्या वतीने नागरी सत्काराचे आयोजन केले होते, त्याप्रसंगी ते बोलत होते.

पूढे बोलताना खासदार निंबाळकर म्हनाले, २००९ च्या लोकसभेला मी व रामराजेंनी एका व्यासपिठावर बसुन पवारांना मताधिक्य दिले,कारण या मतदार संघाचा जानता राजा विकास करेल, ते आशा फोल ठरली, आता काळजी करू नका, देवेंद्र फडणवीस आपल्याबरोबर आहेत, काहीही मागा, ती देण्याची जबाबदारी माझी आहे.

प्रारंभी के.के.पाटील यांनी प्रास्ताविक केले. बाळासाहेब सरगर यांनी निरा देवधरचा ईतिहास सांगितला, हणमंतराव सूळ यांनी धनगर आरक्षणाचा प्रश्न संसदेत माडण्याची मागणी केली.

या नागरी सत्कारासाठी के.के. पाटील हणमंतराव सूळ, आप्पासाहेब देशमुख सोपानराव नारनवर बाळासाहेब सरगर दादासाहेब उराडे पांडुरंग वाघमोडे प्रविण काळे, संजय देशमूख नगससेवक ,दिपक काळे, ज्ञानेश्वर उराडे, देविदास चांगण, सूधीर काळे, संजय उराडे, हणमंतराव ढालपे युवराज वाघमोडे आदि मान्यवर तसेच नागरीक मोठ्या सख्येने उपस्थित होते.

निरा– देवधर प्रकल्प व फलटण पंढरपुर रेल्वेमार्गासाठी ,आमदार रणजितसिंह मोहिते पाटील,आमदार राम सातपुते यानीही प्रयत्न केल्याचे खासदार निंबाळकर नी सागितले.

---

शरद पवारांच्या मि डोक्यातच नाही तर ह्रदयातसूद्या आहे,गेल्या अडिच वर्षात अनेक प्रकरणे काढून माझ्यामागे भूंगे लावण्याचा प्रयत्न केला पण परमेश्वर आनि देवेंद्र फडणवीस यांची शक्ती मागे असल्यामूळे माझ्या केसालाहि धक्का लागणार नाहि.

---

निरा देवधर प्रकल्प व लोणंद पढरपुर रेल्वे माझे वडील कै.माजी खासदार हिंदूराव नाईक निंबाळकर यांचे स्वप्न साकार झाल्याने समाधान वाटले,यापुढे माळशिरस तालूक्यात एम.आय.डी.सी व बूलेट ट्रेण आणणार असून तालूका हिरवागार केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर**
**सात रस्ता, कारीगर पेट्रोल पंपासमोर, सोलापूर - ४१३००३**
**ई-निविदा सूचना क्रमांक-१७ सन २०२२-२०२३ (ऑनलाईन)**

**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर** योग्य त्या कंत्राटदारांकडून खालील कामाकरिता **बी-१** नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, सोलापूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रूपये |
|---|---|---|
| १ | सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील दुधनी ते नंदर्गी राज्यहद्द रस्ता प्रजिमा-५६ कि.मी.०/०० ते ४/०० मध्ये सुधारणा करणे. | रू.१०७.३२ लक्ष |
| २ | सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील सुलेरजवळगे मुंढेवाडी अंकलगी रस्ता प्रजिमा-४९ कि.मी.१७/०० ते २१/०० (कि.मी. १७/०० ते १९/०५०) मध्ये सुधारणा करणे. | रू.११०.३२ लक्ष |
| ३ | सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील तांदुळवाडी संगदरी रस्ता प्रजिमा-४७ कि.मी. ४९/८०० ते ५१/०० मध्ये सुधारणा करणे. | रू.११३.३१ लक्ष |
| ४ | सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुडल देविकवठे म्हैसलगी खानापूर गुड्डेवाडी आळगी शेगांव मुंढेवाडी रस्ता प्रजिमा-५९ कि.मी. २७/०० ते ३३/४०० (कि.मी. २७/०० ते २९/७५०) मध्ये सुधारणा करणे. | रू.१४६.९२ लक्ष |
| ५ | सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील रा.मा.२११ ते गोगांव खैराट भुरीकवठे किरनळ्ळी रस्ता प्रजिमा-१५५ कि.मी. ५/०० ते १३/०० (कि.मी. ५/०० ते ८/००) मध्ये सुधारणा करणे. | रू.१४९.९७ लक्ष |

टिप :- वरील निविदेबाबतची संपूर्ण माहिती खालीलप्रमाणे संकेतस्थळावर दि.०७/०२/२०२३ नंतर उपलब्ध करून देण्यात येत आहे.
१) http://mahapwd.com
२) http://mahatenders.gov.in
३) कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, सोलापूर सूचना फलक.

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर**

DGIPR -C5695

# अरणच्या विकासासाठी पुढाकार घेणार : आ. पाटील



## बहुजन मुक्ती पार्टीच्या प्रदेश प्रवक्तेपदीजाधव

**सुराज्य/वेळापूर :** बहुजन मुक्ती पार्टीचे नेते काकासाहेब जाधव यांची प्रदेश प्रवक्तेपदी निवड करण्यात आली आहे. बहुजन मुक्ती पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रवेन्द्रजी प्रतापसिंह यांच्या अध्यक्षतेखाली औरंगाबाद येथे पक्षाच्या राज्यस्तरीय बैठक पार पडली.काकासाहेब जाधव हे बहुजन मुक्ती पार्टीच्या माध्यमातून गेली कित्येक वर्षे बहुजन समाजातील शोषित, पीडित, वंचित, शेतकरी, कष्टकरी, महिला, विद्यार्थी यांच्या न्याय, हक्क, अधिकारासाठी सदैव मोर्चा, आंदोलनाच्या संवैधानिक माध्यमातून तत्पर असतात. काकासाहेब जाधव यांनी मागील काही वर्षात बहुजन मुक्ती पार्टीच्या पक्ष वाढीसाठी अविरतपणे, निष्ठेने काम केले. त्याचीच पोचपावती म्हणून राष्ट्रीय अध्यक्षांनी त्यांच्यावर विश्वास टाकत त्यांच्यावर महाराष्ट्र राज्य प्रवक्तेपद ही जबाबदारी टाकली आहे. यावेळी बहुजन मुक्ती पार्टीचे राष्ट्रीय महासचिव ॲड. राहुल मखरे, पार्टीचे राष्ट्रीय समीक्षा प्रभारी गौतम बनसोडे, युवाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अनिलकुमार माने, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष श्रीकांतदादा होवाळ यांच्यासह वरिष्ठ पदाधिकारी, लखनदादा चव्हाण, प्रतापदादा पाटील, ॲड. सुजाता चौदंते, सारिका भगत, सौरभ गायकवाड, अल्ताउल्हा खान, ॲड. अनिल किनाके यांच्यासह राज्यभरातून आलेले तालुका, जिल्हा व राज्यस्तरीय पदाधिकारी उपस्थित होते.

## अरणमध्ये जिल्ह्यातील सर्वात उंच वारकरी ध्वज



**सुराज्य/मोडनिंब**

**श्री संत शिरोमणी सावता महाराज यांची जन्मभूमी कर्मभूमी आणि संजीवन समाधी असलेल्या सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यात श्रीक्षेत्र अरणच्या विकासासाठी भक्कमपणे पुढाकार घेणार असल्याचे व कोणताही निधी कमी पडू दिला जाणार नाही. वारकऱ्यांची सेवा हीच माझी सेवा असे मानून कामासाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे उदगार आमदार रोहित पवार यांनी काढले.**

आमदार पवार यांच्या संकल्पनेतून अरण येथील सावता महाराज यांचे वंशज हभप रमेश महाराज वसेकर यांच्या शेतामध्ये वारकरी ध्वजाचा लोकार्पण सोहळा पार पडला.

यावेळी ते बोलत होते. सोमवारी सावता महाराज समाधी मंदिर स्थळापासून कार्यक्रम स्थळापर्यंत ध्वज दिंडी काढण्यात आली. यानंतर ध्वजवंदन करण्यात आले.

संत सावता महाराजांचे वंशज रमेश महाराज वसेकर आमदार बबनदादा शिंदे, सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याण आखाडे, विद्यमान जिल्हा परिषद सदस्य भारत शिंदे, समाज कल्याण समितीचे माजी सभापती शिवाजी कांबळे, सरपंच सुरत्नप्रभा ताकतोडे, उपसरपंच वसंत इंगळे,


देवस्थान ट्रस्टचे सचिव ॲड. विजय शिंदे, सावता परिषदेचे सचिव राजीव काळे, मयूर वैद्य, शंकर वाघमारे, देवानंद राऊत, जिल्हाध्यक्ष मृदुल माळी, संजय पवार, रमेश बारस्कर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्र ही संताची भूमी असून संताचे विचार वारकरी सांप्रदायामुळे आजही टिकून आहेत व हे समानतेचे विचार पुढे चालविणे गरजेचे आहे.

सावता महाराजांचे विचार आचरणात आणणे व ते महान संत महापुरुष यांचा सर्वांनी आदर केला पाहिजे, असा विचार आमदार पवार यांनी मांडला. अरण गावात भक्त निवास, अन्नछत्र मंडळ व इतर विकास कामासाठी गावामध्ये जमीन अधिग्रहित होणे गरजेचे आहे.

सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याण आखाडे यांनी सांगितले की, सावता महाराज संजीवन समाधी मंदिर, समाधी स्थळ, अरण परिसर विकासासाठी सावता परिषदेच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न करीत आहे. तिर्थक्षेत्र विकास यासाठी सावता परिषद नियमित पुढाकार घेत आहे.

अरण तिर्थक्षेत्र विकास हेच सावतापरिषदेचे ध्येय असल्याचे सांगितले. प्राध्यापक राजीव काळे, मयूर वैद्य, संतोष राजगुरू, शंकरराव वाघमारे यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले.

अरणमध्ये वारकरी ध्वज उभारणीसाठी सावता महाराजांचे वंशज रमेश महाराज वसेकर यांनी स्वतःची १६ गुंठे जमीन दिल्याबद्दल त्यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



## संजीवन ठेव योजनेच्या माध्यमातून दहा लाख रुपये प्रदान

**सुराज्य/अकलूज :** निमगाव विद्यामंदिर निमगाव येथील मुख्याध्यापक हनुमंत वाघमारे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दु:खद निधन झाले आहे. ते आपल्या सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक सेवक सहकारी पतसंस्था बाळे या पतसंस्थेचे सभासद होते. या सोसायटीमध्ये संजीवनी ठेव योजनेच्या माध्यमातून कै. वाघमारे सरांच्या वारसांना आज दहा लाख रुपयांचा चेक शिक्षण प्रसारक मंडळ अकलूजचे मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते देण्यात आला. पतसंस्थेचे मार्गदर्शक माजी आमदार दत्तात्रय सावंत यांच्या कल्पनेतून आलेल्या संजीवनी ठेव योजनेचा लाभ जिल्ह्यातील अनेक लोकांना झाला आहे. गेलेला माणूस माघारी येऊ शकत नाही परंतु आपल्या पतसंस्थेमार्फत त्यांच्या कुटुंबावर येणाऱ्या आर्थिक संकटातून बाहेर काढले जाते. महाराष्ट्रात एकमेव पतसंस्था आहे जी सभासदांच्या अकस्मात निधनानंतर दहा लाख रूपये वारसांना देते. समाजातील सर्व स्तरातून या संजीवनी ठेव योजनेचे व माजी आमदार सावंत सरांचे अभिनंदन केले जात आहे. यानिमित्ताने पतसंस्थेचे चेअरमन समाधान घाडगे, निमगाव शाळेचे अध्यक्ष इनामदार, संचालक बिभीषण जाधव, तात्यासाहेब काटकर, मार्गदर्शक समाधान दुधाट, आसबे, सुरवसे सर यांचे आभार व्यक्त केले जात आहे.

## खेलो इंडिया राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत महाराष्ट्र संघाला सुवर्णपदक

**सुराज्य/वेळापूर**

मध्यप्रदेश जबलपूर येथे झालेल्या खेलो इंडिया खो-खो स्पर्धेत वेळापूर येथील इंग्लिश स्कूलचा विद्यार्थी व अर्धनारीनटेश्वर क्रिडा मंडळाचा खेळाडू गणेश बोरकर याने सुवर्णपदक मिळवले आहे. झालेल्या अंतिम सामना महाराष्ट्र विरुद्ध दिल्ली संघात झाला. पहिल्या डावात दिल्ली ८ गुण व महाराष्ट्र ९ गुण पहिल्या डावात महाराष्ट्र संघाकडे एक गुणांची आघाडी होती. दुसऱ्या डावात दिल्ली ६ गुण व महाराष्ट्र १० गुण महाराष्ट्र संघाने ५ गुणांनी अंतिम सामना जिंकला. गणेश बोरकरने आतापर्यंत सहा सुवर्णपदके मिळवली आहेत. त्याला इंग्लिश स्कूल वेळापूरचे मुख्याध्यापक आर बी पवार, मुख्य क्रीडा शिक्षक सतीश कदम, शिवाजी जाधव, राष्ट्रीय खोखो पंच जावेद मुलाणी, राष्ट्रीय खोखो प्रशिक्षक सोमनाथ बनसोडे आदींचे मार्गदर्शन लाभले.



गणेश बोरकर याने राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक मिळाल्याबद्दल त्याचे अर्धनारी नटेश्वर क्रीडा मंडळ वेळापूर, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्ह्याचे नेते उत्तमराव जानकर, जि. प. सदस्य बाळासाहेब धाईंजे, सामाजिक न्याय विभाग जिल्हाध्यक्ष डॉ. धनंजय साठे, संदीपतात्या माने देशमुख रिपाइं माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे संजय देशपांडे, मार्केट कमिटीचे माजी संचालक दादासाहेब घाडगे, वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच तानाजी चव्हाण, विनायक माने, लखन मंडले, ग्रामपंचायत सदस्य संजयआबा मंडले, हनुमंत वायदंडे, निवृत्ती भुसारे, काशिनाथ आडत ,पोपटराव जानकर, जब्बार मुलाणी, डॉ. धनंजय जानकर, भाऊसाहेब जानकर, अमोल पनासे, महाराष्ट्र पोलीस शहाजी मंडले, पत्रकार शिवाजी मंडले, श्रीनाथ खटके, भरत अवार्ड विजेता जावेद आतार, शिक्षण प्रसारक मंडळ मंगळवेढा संस्थेचे अध्यक्ष ॲड. सुजित कदम, संस्थेच्या सचिवा प्रियदर्शनी महाडिक आदींनी अभिनंदन केले आहे.

## लोकशाही दिनातील तक्रारींचा लवकर निपटारा करा : जिल्हाधिकारी

**सुराज्य/सोलापूर**

**जिल्हास्तरीय लोकशाही दिनात ७१ अर्ज प्राप्त आहेत. सर्व अर्जातील तक्रारींचा तात्काळ निपटारा करत संबंधित विभागाने कार्यवाही करावी तसेच प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली काढावीत, अशा सूचना जिल्हाधिकारी मिलींद शंभरकर यांनी दिल्या.**

सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन जिल्हाधिकारी मिलींद शंभरकर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. जिल्हाधिकारी कार्यालय झालेल्या लोकशाही दिनात लोकशाही दिनात ७१ अर्ज प्राप्त झाले आहेत. यामध्ये १२ अर्जदारांनी समक्ष भेटून आपली निवेदने सादर केली.

यावेळी तक्रारदारांचे जिल्हाधिकारी शंभरकर यांनी प्रत्यक्ष म्हणणे ऐकून घेतले. तसेच तक्रार अर्जावर संबधित विभाग प्रमुखांनी तात्काळ कार्यवाही करुन अडचणी सोडविण्याबाबत सूचना दिल्या.

मलकव्वा सिद्रामप्पा परतबादी राहणार करजगी, तालुका अक्कलकोट यांनी कालव्यामुळे झालेली नुकसान भरपाई मिळण्याबाबतचा अर्ज सादर केला होता. यावर कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र.१ सोलापूर व अर्जदार यांची सुनावनीबाबत बैठक लावण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. तसेच यावेळी मुख्यमंत्री सचिवालय कक्षाकडील तसेच पालकमंत्री कक्षाकडील निवेदनाचा यांचा आढावा घेण्यात आला.

अर्जावार १५ दिवसांत अंतिम कार्यवाही करावी अशा सूचनाही जिल्हाधिकारी शंभरकर यांनी यावेळी दिल्या. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

## विकास निधीतील वाटपात अनियमिततेबाबत उपोणाचा इशारा

**सुराज्य/सांगोला :** सांगोला तालुक्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्त्यांच्या विकास निधीतील वाटपात अनियमितता होत असल्याने शेकापच्यावतीने सोलापूर जिल्हा परिषदेसमोर ८ फेब्रुवारीपासून बेमुदत उपोषण केले जाणार असल्याचे निवेदन जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले आहे. यावेळी शेकापचे ज्येष्ठ नेते चंद्रकांतदादा देशमुख, युवानेते डॉ. बाबासाहेब देशमुख, माजी सभापती बाळासाहेब काटकर व राणीताई कोळवले यांचे सह शेतकरी कामगार पक्षाचे सरपंच, आजी-माजी जिल्हा परिषद सदस्य,पंचायत समिती सदस्य आणि सभापती व उपसभापती उपस्थित होते. सांगोला तालुक्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्त्यांचा विकास करण्यासंदर्भात सांगोला तालुक्यातील ग्रामपंचायतींनी जिल्हा परिषदेकडे सुमारे १४५ प्रस्ताव पाठवले आहेत. परंतु ते प्रस्ताव मंजूर न करता जि.प.च्या समाज कल्याण विभागाने मूळ प्रस्ताव मंजूर न करता नव्याने गांवांची नांवे घालून चुकीच्या पद्धतीने प्रस्ताव मागवले आहेत, असे चुकीचे प्रस्ताव पाठवण्याबाबत सांगोला पंचायत समितीचे गटविकास अधिकारी हे ग्रामसेवक व सरपंचावर दबाव आणत आहेत. याचा निषेध म्हणून शेकापचे आजी-माजी जि.प. सदस्य, सभापती, सरपंच, पंचायत समिती सदस्य, पक्षाचे पदाधिकारी व सहकारी संस्थांचे तालुका स्तरावरील चेअरमन व संचालक हे बुधवार दि. ८ फेब्रुवारी रोजी जिल्हा परिषदेसमोर बेमुदत उपोषण करणार आहेत.

## रुक्मिणी सातारकर यांच्या निधनाबद्दल गुरुवारी शोकसभा

**सुराज्य/सोलापूर**



ह.भ.प. बाबामहाराज सातारकर यांच्या पत्नी सौभाग्यवती रुक्मिणी सातारकर यांचे नुकतेच निधन झाले.

त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी अखिल भाविक वारकरी मंडळ यांचे माध्यमातून ह.भ.प. सुधाकर महाराज इंगळे यांच्या उपस्थितीत आणि उद्योजक दत्ताअण्णा सुरवसे यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार दि. ९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी मुरारजी पेठेतील सुर्या हॉटेल, येथील सभागृहात सोलापूर शोकसभा आयोजित करण्यात आली आहे.

## गंभीर मारहाण केल्याप्रकरणी ६ जणांविरोधात गुन्हा दाखल

**सुराज्य/मोहोळ**

कंपनीतून बाहेर उडून येणारी राख बंद करण्याची व्यवस्था करा, असे म्हणून लोखंडी रॉड, हॉकी स्टिकने तीन जणांना गंभीर मारहाण केल्याप्रकरणी ६ जणावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चिंचोली एमआयडीसीमध्ये ढेकळे ऑरगॅनिक प्रायव्हेट लिमिटेड नावाची खताची कंपनी आहे. या कंपनीत माल उतरवत असताना राख व धुरळा होण्याचे बंद करा असे म्हणून आमच्या कंपनीच्या गेट समोर काहीजण येऊन खत कंपनीचे मॅनेजर कल्याण ज्योतीराम सावंत यांना दमदाटी केली. रविवारी रात्री कंपनी मॅनेजर सावंतचा फिर्यादी ढेकळे यांना फोन आला आणि कंपनी समोर पट्टू उर्फ दादा नागणे, बाळू नागणे, शेखर नागणे, चतुर नागणे, संदीप नागणे व महेंद्र वाघमारे हे कंपनी बाहेर लोखंडी रॉड हॉकी स्टीक घेवून थांबले होते. यावेळी ब्रह्मानंद ढेकळे व त्याच मुलगा तनिष्क ढेकळे हे कंपनी जवळ पोचले असता तिघांनाही मारहाण करून गंभीर जखमी केले आणि सोन्याची चैन हिसकावून घेऊन निघून गेले म्हणून मोहोळ पोलीस ठाण्यात त्या ६ जणांविरुद्ध मोहोळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या आचार्य पदवीने डॉ. सुरवसे सन्मानित

**सुराज्य/वेळापूर**

विठ्ठलवाडी तालुका माळशिरस येथील सामान्य शेतकरी कुटुंबातील डॉ. समाधान आप्पासाहेब सुरवसे यांना डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथे कृषी विद्यापीठातील दीक्षांत समारंभात महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते व भारतीय कृषी संशोधन परिषदेचे माजी उपमहासंचालक (शिक्षण) डॉ. नरेंद्रसिंह राठोर, कुलगुरू डॉ. शरद गडाख, कुलसचिव डॉ. सुरेंद्र काळबांडे यांच्या उपस्थितीत आचार्य ही पदवी देऊन गौरविण्यात आले. 'जमिनीची सुपीकता' या विषयावरती त्यांनी प्रबंध सादर केला होता. डॉ. समाधान सुरवसे यांचे प्राथमिक शिक्षण चंद्रशेखर आगाशे विद्यालय श्रीपूर येथे झाले. ते सध्या वसंत दादा शुगर इन्स्टिट्यूट पुणे येथे सोईल सायन्स डिपार्टमेंट मध्ये सायंटिफिक ऑफिसर या पदावर ती काम करत आहेत. येणाऱ्या भविष्यकाळात जमिनीचे आरोग्य टिकविणे ही काळाची गरज असून त्यावरती त्यांचे संशोधनाचे काम सुरू आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपले शिक्षण पूर्ण करून उच्च विद्या विभूषित ही पदवी मिळविल्याबद्दल श्री पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी, ऊस विकास अधिकारी सोमनाथ भालेकर यांनी त्यांचे अभिनंदन केले. तसेच श्रीपूर, बोरगाव, माळखांबी विठ्ठलवाडी परिसरामधुन या यशाबद्दल डॉ. सुरवसे व सुरवसे कुटुंबीयांचे कौतुक केले जात आहे.

## सोलापूरची साहित्य परंपरा जुनी आहे : डॉ. सबनीस

**सोलापूर :** सोलापूरची साहित्यपरंपरा जुनी आहे. ही परंपरा समृद्ध करण्यासाठी सध्याची लेखक मंडळी कार्यरत आहेत. ग्रामीण साहित्याच्या जडण घडणीमध्ये संध्या धर्माधिकारी यांचे योगदान मोलाचे असल्याचे मत डॉ. श्रीपाद सबनीस यांनी व्यक्त केले.



संध्या धर्माधिकारी लिखित 'रकमा' या कथासंग्रहाचे प्रकाशन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी मंचावर संध्या धर्माधिकारी, ज्येष्ठ साहित्यिक योगिराज वाघमारे, डॉ. शिवाजी शिंदे, डॉ. दत्तात्रय घोलप, ज्येष्ठ साहित्यिक राजेंद्र भोसले, ज्येष्ठ कवी मारुती कटकधोंड, ज्येष्ठ कथालेखक हरिश्चंद्र पाटील, कवी आबासाहेब पाटील, डॉ. श्रुती वडकबाळकर उपस्थित होते. लेखिका संध्या धर्माधिकारी यांच्या 'रकमा' कथासंग्रहात ग्रामीण स्त्रीच्या आयुष्याचे चित्रण करण्यात आले आहे. यामध्ये एकूण बारा कथांचा समावेश हे पुस्तक साहित्य व संस्कृती मंडळ, महाराष्ट्र शासनाच्यावतीने प्रकाशित करण्यात आले आहे. या पुस्तकास डॉ. श्रीपाद सबनीस यांची प्रस्तावना आहे. प्रास्ताविक राजेंद्र भोसले यांनी केले. सूत्रसंचालन तब्बस्युम सय्यद यांनी केले. आभार नारायण पोतदार यांनी मानले. या कार्यक्रमास डॉ. नसीम पठाण, पद्मजा भोजे यांच्यासह साहित्यरसिक उपस्थित होते.

## जनरल नॉलेज स्पर्धेत १२०० हून जास्त विद्यार्थ्यांचा सहभाग

**सुराज्य/टेंभुर्णी :** श्री माऊली शिक्षण प्रसारक व समाजसेवक मंडळाच्या सचिवा शिवमती सुरजाताई योगेशजी बोबडे यांच्या वाढदिवसानिमित्त टेंभुर्णी येथे लक्ष्मी आनंद विद्यामंदिर ज्युनि. कॉलेज यांच्यावतीने 'भव्य राज्यस्तरीय जनरल नॉलेज स्पर्धेचे' आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये टेंभुर्णी व पंचक्रोशीतील सर्व शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. प्रत्येक विद्यार्थी हा आपल्या शाळेमध्ये सर्वच समाज सुधारकांची जयंती वा पुण्यतिथी साजरी करीत असतो; परंतु त्यांच्या विचारांचे अनुकरण विद्यार्थ्यांकडून होईलच असे नाही म्हणूनच समाजसुधारकांच्या चरित्रांना व कृतिशील विचारांना उजाळा मिळावा व विद्यार्थ्यांनी महिला समाजसुधारकांचे वाचन करावे या उद्देशाने या जनरल नॉलेज स्पर्धेचे आयोजन केले होते. यावेळी पालकही मोठ्या संख्येने उपस्थित होते. सध्या जगभर विविध क्षेत्रांमध्ये स्पर्धा वाढत आहे. आपल्या भागातील विद्यार्थी या स्पर्धेमध्ये टिकावा व त्याने यश मिळवावे या हेतूने श्री माऊली शिक्षण संस्था नेहमीच वेगवेगळे उपक्रम राबवित असते. त्यामधीलच हा स्तुत्य असा उपक्रम राबविला गेला. माऊली शिक्षण प्रसारक व समाजसेवा संस्थेचे अध्यक्ष योगेश बोबडे व सचिवा सुरजा यांच्या मार्गदर्शनाखाली सदर सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी परिक्षेनंतर सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे खाऊ वाटपाने तोंड गोड करण्यात आले. स्पर्धा यशस्वी करण्यामध्ये सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचा सहभाग मोलाचा होता. दि. ८ फेब्रुवारी रोजी सकाळी १०. वा. लक्ष्मी आनंद विद्यामंदिर ज्युनि कॉलेज, टेंभुर्णी येथे सदर स्पर्धेचा निकाल व बक्षीस वितरण सोहळा संपन्न होईल. प्रत्येक स्पर्धक विद्यार्थ्यास विशेष भेट देण्यात येणार आहे.

# लता मंगेशकर प्रथम स्मृती दिन-एक यादगार कार्यक्रम

## 'अशर-ए-उर्दूमध्ये खादिमाने उर्दू फोरमतर्फे यादे रफतगाँ'

**सुराज्य/सोलापूर**

**अशर-ए-उर्दू २०२३ निमित्त 'यादे रफतगाँ' या श्रध्दांजली कार्यक्रमाचे आयोजन हिराचंद नेमचंद वाचनालय- संगीत विभाग आणि खादिमाने उर्दू फोरम यांच्यातर्फे लता मंगेशकर यांनी गायलेल्या फिल्मी आणि गैर-फिल्मी गीतांवर एक अनोखा कार्यक्रम नुकताच, ३ फेब्रुवारी २०२३ रोजी वाचनालयाच्या अम्फी थियेटर येथे संपन्न झाला. भारतरत्न लता मंगेशकर आणि उर्दूचे अभ्यासक साहित्यिक गोपीचंद नारंग यांना श्रद्धांजली वाहण्याचे आणि स्मृती जागवण्याचे औचित्य या कार्यक्रमात होते.**



उर्दूच्या विकासासाठी कार्यरत खादिमाने उर्दू ही संस्था आणि संगीत संग्रहालय यांच्या संयुक्त विद्यमाने सादर या कार्यक्रमात लता मंगेशकर यांच्या उर्दू गजला ऐकवण्यात आल्या. त्याचे अर्थ उलगडत डॉ. अब्दुल रशीद शेख यांनी प्रत्येक गझलवर प्रभावी भाष्य केले. प्रत्येक गझल त्यांनी स्वतंत्र उलगडली आणी अवघड जागाचे अर्थ स्पष्ट केले, आणि गझलचे व्याकरण देखील.... कार्यक्रमात सुरुवातीला नसीर आळंदकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले आणि कार्यक्रमाचे स्वारूप स्पष्ट केले. खादिमाने उर्दूचे अध्यक्ष यांनी सांगितले की, 'लता मंगेशकर आणि डॉ. गोपीचंद नारंग हे दोघेही जगात 'उर्दूचे दूत' म्हणून ओळखले जातील. लता मंगेशकर यांनी उर्दू उच्चार नेमके यावेत यासाठी विशेष अभ्यास केला होता. त्यांच्या जाण्यामुळे उर्दूचे मोठे नुकसान झाले आहे, असे अध्यक्ष विकार शेख यांनी सांगितले.

रेकॉर्ड कलेक्टर्सचे मोहन सोहोनी आणि जयंत राळेरासकर यांनी केलेल्या निवेदनात चित्रपटातील गझल कशी होती याची आठवण करून दिली. इतर काही रंजक किरसे आणि माहिती देत निवेदन केले. कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला. विकार शेख यांनी देखील निवेदनात साथ केली.

अध्यक्षीय भाषणात हिराचंद नेमचंद वाचनालयाचे कार्यवाह डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी सोलापूरचे बहुभाषिक वैविध्य स्पष्ट केले. कार्यक्रमात मिर्झा गालिब, इक्बाल, मीर तकी मीर, नक्षलालपुरी, साहीर लुधियानवी, मजरूह, गुलजार इत्यादींच्या फिल्मी आणि गैर-फिल्मी गझल ऐकवण्यात आल्या. लता मंगेशकर यांनी गायलेल्या या सगळ्या अनवट गझल ऐकण्यासाठी रसिकांनी गर्दी केली होती. यावेळी उर्दू फोरमचे सचिव मन्नान शेख, संचालक रफिक खान, प्रा. विलास बेत, अण्णासाहेब कोतली, नसीमा पठान, डॉ. तोष्णीवाल, डॉ. दिलीप बुरटे, आकाशवाणीचे निवेदक अभिराम सराफ, डॉ. श्रीकांत कामतकर उपस्थित होते.

# सोलापुरात हक्काच्या 'एफआरपी'पासून शेतकरी वंचित

## हंगाम संपत आला तरी ७८६.६९ कोटी रुपये कारखान्यांकडे थकीत; सुरुवातीस आक्रमक असणाऱ्या शेतकरी संघटना झाल्या मवाळ

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर विभागातील ५० साखर कारखान्यांकडून यंदाच्या हंगामातील ३१ जानेवारीपर्यंतचे एफआरपी'चे बेसिक रिकव्हरीप्रमाणे २८३०.८० कोटी रुपये ऊसबिलाच्या स्वरुपात शेतकऱ्यांना मिळाले.पण यंदाचा हंगाम अंतिम टप्प्यात आला, तरी शेतकऱ्यांना एफआरपी मिळू शकलेली नाही. यंदाच्या हंगामातील आतापर्यंत ७८६.६९ कोटी रुपये एफआरपीचे कारखान्यांकडे थकीत आहेत.

यंदा सोलापूर जिल्ह्यातील ३७ व उस्मानाबाद जिल्ह्यातील १३ अशा एकूण ५० कारखान्यांनी विभागात गाळप हंगाम घेतला आहे.

सोलापूर जिल्ह्यातील कारखान्यांनी एफआरपीचे २२४०.०३ कोटी तर उस्मानाबाद जिल्ह्यातील १३ कारखान्यांनी ५९०.७७ कोटी रुपये जानेवारीअखेर दिले आहेत.असे असले तरीही सोलापूर जिल्ह्यातील २९ कारखान्यांकडे एफआरपीचे ६९६.९१ कोटी तर उस्मानाबाद जिल्ह्यातील ८ कारखान्यांकडे ८९.७८ कोटी रुपये थकीत आहेत. गळीत हंगामाच्या सुरुवातीस आक्रमक होत 'कोण म्हणतो देत नाय...घामाचा दाम घेतल्या शिवाय राहत नाय'.. अश्या घोषणा देत आंदोलनाचे इशारे देणाऱ्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या शेतकऱ्यांच्या संघटना या थकित एफआरपी साठी 'ब्र' शब्द काढताना दिसत नसूनही मवाळ झाल्या असल्याचे चित्र दिसून येत आहे.

यंदा उसाचे क्षेत्र कमी असल्याने अनेक कारखान्यांनी ऊसाची पळवापळवी करीत 'टार्गेट' पुर्ण करण्यासाठी धावपळ करीत असताना कारखानदारांमध्ये ऊस दराची स्पर्धा होईल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती. मात्र, तसे न होता उलट थकीत एफआरपी वाढतच गेली आहे. त्यातच आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या एकरी ऊस उत्पादनात मोठी घट झाली असल्याचे दिसून येत आहे.या थकीत एफआरपी शेतकऱ्यांना मिळाव्यात अशी मागणी ऊस उत्पादकातून केली जात आहे.

**एफआरपी'साठी नियमावली करणे गरजेचे**

पुढील हंगाम चालू व्हायची वेळ आली तरीही एफआरपीसाठी शेतकऱ्यांना प्रतीक्षा करावी लागते. साखर आयुक्तालयाने पंधरवड्याचा एफआरपी अहवाल घेताना कारखान्यांसाठी नियमावली तयार करून त्यासाठी यंत्रणा उभारायला हवी.कारखान्यांनी प्रत्येक पंधरवड्यात ऊसबिलाच्या याद्या बँकांना देऊन त्या बँकांकडून प्रमाणित करून घेण्याचे बंधन घालायला हवे, अशा प्रमाणित केलेल्या याद्याच साखर आयुक्तालयाने स्वीकारायला हव्यात.

जेणेकरून कारखान्यांनी प्रत्येक पंधरवड्यात दिलेली एफआरपी व थकीत एफआरपीचा वस्तुनिष्ठ आकडा समोर येईल व शेतकऱ्यांना वेळच्यावेळी एफआरपी मिळेल.

**कारखानानिहाय ३१ जानेवारीअखेर थकीत एफआरपी (कोटी रुपयांत)**

**सोलापूर जिल्हा :**

सिद्धेश्वर-२५.३२, संत दामाजी-१३.१०, श्री मकाई-२०.२९, संत कुर्मदास-१३.१०, सासवड माळी-१५.०, लोकमंगल (बीबीदारफळ)-८.३८, लोकमंगल (भंडारकवठे)-२३.६३, सिद्धनाथ-४९.२१, जकराया-१४.०८, इंद्रेश्वर-१२.५३, भैरवनाथ (विहाळ)-३३.१६, भैरवनाथ (लवंगी)-३५.४३, युटोपियन-२८.८४, मातोश्री शुगर-१९.२९, भैरवनाथ (आलेगाव)-१९.४३, बबनरावजी शिंदे- १३.६७, ओंकार-०.३२, जयहिंद-१४.३७, विठ्ठल रिफाइंड-४१.६२, आष्टी शुगर-९.४६, भीमा-४८.०३, सहकार शिरोमणी-३६.२६, सीताराम महाराज-२.४२, धाराशिव (सांगोला)-१५.५३, श्री शंकर-३१.७१, आवताडे शुगर्स-२४.०७, विठ्ठल (गुरसाळे)-५५.९१, येडेश्वरी-४.९०.

**उस्मानाबाद जिल्हा :**

विठ्ठलसाई-१४.१४, डॉ. बाबासाहेब आंबेडकर-२.३१, भैरवनाथ (वाशी)-१०.६७, धाराशिव (कळंब)-१३.७०, भैरवनाथ (सोनारी)-२५.७३, लोकमंगल माऊली-१९.४४, क्यूनर्जी-२.८८, डीडीएनएसएफए-०.९१.





## स्मार्ट ग्राम पुरस्कारासाठी वाकी – शिवणे ग्रा.पं.ची निवड

✔ **सांगोला** : आर.आर. (आबा) पाटील सुंदर गाव योजनेतून तालुकास्तरीय स्मार्ट ग्राम पुरस्कारासाठी सांगोला तालुक्यातून एकमेव वाकी -शिवणे ग्रामपंचायतीची निवड झाली आहे तर जिल्हास्तरीय प्रथम क्रमांकासाठी वाकी शिवणे ग्रामपंचायतीची माढा (वडाचीवाडी आऊ) व दक्षिण सोलापूर (दिंडूर) ग्रामपंचायतीबरोबर स्पर्धा असणार आहे. यावेळी महिलांनी जिल्हास्तरीय समितीच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचे औक्षण करून आंबा वृक्ष भेट देऊन स्वागत केले. सोलापूर जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आर.आर. (आबा) पाटील सुंदर गाव स्पर्धातंर्गत वाकी शिवणे ग्रामपंचायतीस जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी ईशादीन शेळकंदे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी पवार सो, जिल्हा कृषी अधिकारी पी.के वाघमोडे, कार्यकारी अभियंता खराडे सो, पाणीपुरवठा अभियंता लोखंडे सो, ग्रामविकास अधिकारी कृषी अधिकारी श्रीमती शेंडे यांनी भेट दिली. दरम्यान जिल्हास्तरीय समिती कार्यालयीन तपासणी व गावाची पाहणी करण्यासाठी येणार असल्याने ग्रामस्थांनी आपापल्या परिसरातील रस्ते अंगण स्वच्छता साफसफाई केली होती रस्त्याच्या दुतर्फा रांगोळ्या काढल्या होत्या. यावेळी ग्रामीण पाणीपुरवठा अभियंता सुरेश कांबळे, जिल्हा परिषद बांधकाम अभियंता नकाते, विस्तार अधिकारी नागटिळक, ग्रामपंचायत विस्तार अधिकारी प्रतिभा पवार, आरोग्य विस्तार अधिकारी मिलिंद सावंत, ग्रामविकास अधिकारी शहाजीराव इंगोले, ग्रा.पं. सदस्य शिवाजी साळुंखे ,तुकाराम जाधव,दत्तू वाळिखिंडे, अनिल हंबीरराव, समाधान व्होवाळ, तुकाराम मोहिते, अंगणवाडी सुपरवायझर जम्बेनाळ, कृषी सहाय्यक आतार आदी उपस्थित होते.

## शिवरत्न पॅटर्नच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन


✔ **अकलूज** : अकलूज शिवरत्न शिक्षण संस्था, अकलूज संचलीत शिवरत्न पॅटर्न, अकलूज च्या वतीने दहावी व बारावी नंतर करीयरच्या संधी या विषयावर विद्यार्थी व पालक यांच्यासाठी वैद्यकीय व अभियांत्रिकी प्रवेश परीक्षा करीता शिक्षणतज्ज्ञ सारिका मोहन पाटील यांचे मार्गदर्शन सेमिनारचे शनिवार दि.११/०२/२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता स्मृतिभवन शंकरनगर अकलूज येथे आयोजन करण्यात आले आहे.दहावी आणि बारावीच्या परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा या निर्णायक वळणावर करिअरच्या दृष्टीने योग्य मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे यासाठी संस्थेच्या अध्यक्षा शितलदेवी मोहिते-पाटील यांच्या सूचनेनुसार विद्यार्थ्यांकरीता करिअरच्या विविध वाटा, व त्यासाठी आवश्यक असलेली पात्रता याबाबत सखोल मार्गदर्शन. प्रवेश प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजेच आपली कागदपत्रे ही कागदपत्रे कोणती असावीत व त्याची वैधता काय असते याबाबत संपूर्ण मार्गदर्शन या सेमीनारमध्ये केले जाणार आहे. Neet/JEE/MHCET परीक्षांना सामोरे जाताना येणाऱ्या अडचणींबाबत सखोल मार्गदर्शन. दहावी व बारावी नंतर कोणत्या शाखेत प्रवेश घ्यायचा? कोणतं करिअर निवडायचं? असे प्रश्न प्रत्येक विद्यार्थी आणि पालकांच्या मनात असतो. तुमच्याकडे असलेल्या क्षमता, मिळणारे ज्ञान, या क्षेत्रातील आव्हानं तसचं तुमच्या अभ्यासाचा उपयोग हे पाहून करिअर निवडावे. त्यासाठी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाची गरज असते. हीच मानसिकता हेरून, शिवरत्न पॅटर्न, अकलूजच्या वतीने करिअर मार्गदर्शन सेमिनारचे आयोजन करण्यात आलेले आहे.




## अदानी समूहाच्या आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी व्हावी; काँग्रेसची मागणी

✔ **मोहोळ** : अदानी समुहाने केलेल्या आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी व्हावी या मागणीसाठी मोहोळ येथे स्टेट बँकेसमोर आयकाँग्रेस च्या वतीने आंदोलन करण्यात आले.केंद्रातील मोदी सरकारने निवडक उदयोगपतीवर मेहरबानी दाखवत सर्व सामान्य माणसाचा कष्टाचा पैसा धोक्यात टाकला आहे. एलआयसीचे २९ कोटी गुंतवणूकदार व स्टेट बँकेच्या ४९ खातेदाराचा कष्टाचा पैसा परत मिळेल का ? अशी भीतीही निर्माण झाली आहे या प्रकरणाची चौकशी व्हावी संसदेत चर्चा व्हावी व गुंतवणूकदारांच्या पैशाला संरक्षण मिळावे यासाठी मोहोळ काँग्रेस कमेटीच्या वतीने स्टेट बँक ऑफ इंडिया मोहोळ शाखेसमोर धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी मोहोळ तालुका अध्यक्ष सुरेश शिवपुजे, किशोर पवार, सिद्राम पवार, दमण चव्हाण नाना मोरे रतनताई कसबे, नामदेव खांडेकर, अशोक गायकवाड, दाजी कोकाटे, शैलेश सरवदे, नामदेव खांडेकर, रशीद शेख आदींसह कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## शहीद जवान संस्थेच्या वतीने संत रोहिदास यांची जयंती साजरी




✔ **सांगोला** : श्री संत शिरोमणी रोहिदास महाराज यांची ६४६ वि जयंती मोठ्या उत्साहात नेहरू चौक येथे शहीद जवान संस्थेच्या वतीने साजरी करण्यात आली सुरुवातीला संत रोहिदास यांच्या प्रतिमेस सामाजिक कार्यकर्ते दादासाहेब फडतरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला यावेळी प्रमुख उपस्थित महादेव खडतरे यांची होती यावेळी दादासाहेब खडतरे आपल्या मनोगत म्हणाले की संत रोहिदास यांचा जन्म माघ शुक्लपौर्णिमेस उत्तर प्रदेशातील मांडूर या गावी झाला.

मराठी संतांप्रमाणे संत रोहिदास यांनी समाजातील भेदभाव नष्ट करण्याचे कार्य केले. प्रपंच व व्यावसाय करीत असतानाही ईश्वराची प्राप्ती करता येते असे सांगितले.. यावेळी या कार्यक्रमास प्रवीण पाटील सर संचित भोसले अजित जाधव अमर वस्त्रद देवा मासाळ व शहीद जवान संस्थेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

सुराज्य Classified

**विवाह विषयक**

सर्व जातीधर्मातील प्रथम वधुवर, विधवा, घटस्फोटीत आंतरजातीय उच्च शिक्षित भरपूर स्थळे उपलब्ध. एकदाच नोंदणी करा. लग्न जुळेपर्यंत स्थळे उपलब्ध करून दिले जातील. श्री तुळजाभवानी वधू-वर सूचक केंद, तुळजापूर

संपर्क : **9763624364, 7410553871** (030323)

## जातीवाचक शिवीगाळ करून तिघांना मारहाण; बाप लेकावर गुन्हा दाखल

चिचोली काटी एमआयडीसीतील घटना

✔ सुराज्य/मोहोळ

शेजारच्या कंपनीची राख उडून येत असल्याने आपल्या कंपनीला दिलेला रंग खराब होत असल्याची विचारणा करण्यासाठी गेलेल्या तिघांना लोखंडी रॉडने मारहाण करून गंभीर जखमी केल्याने आणि जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी बापलेकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मोहोळ पोलिसांनी दिलेल्या माहीती नुसार फिर्यादी हे बांधकाम ठेकेदार असून चिंचोली काटी ग्राम पंचायतीचे सदस्य होते. चिंचोली एमआयडीसी या ठिकाणी त्यांचे मित्र दादासाहेब प्रभाकर नागणे यांची प्रतीक इंडस्ट्रीज नावाची आईस् फॅक्टरी आहे. त्याचे रंग काम सुरु आहे. रविवारी सायंकाळी फिर्यादी यांच्या मोबाईलवर दादासाहेब नागणे यांचा फोन आला. कंपनीत मारामारी चालू असून ढेकळे यांनी मारामारीसाठी माणसे पाठवली आहेत असे सांगीतले. त्यानुसार फिर्यादी हे रात्री पावणे दहा वाजता कंपनीजवळ पोहोचले असता नागणे व गावातीलच महेश मोहन भोसले या दोघांच्या डोक्यातून रक्त येत असल्याचे दिसले. यावेळी वाघमारे यांनी त्यांना काय झाले असे विचारले असता ढेकळे यांनी मारण्यासाठी माणसे पाठवली होती. त्यांनी मारहाण केली असल्याचे सांगितले. यावेळी याचे कारण विचारले असता आपल्या कंपनीच्या शेजारी प्रणव ढेकळे यांची खत तयार करण्याची कंपनी आहे. याची राख उडून पडत होती. त्यामुळे कंपनीला दिलेला रंग खराब होत होता. याबाबत राख उडण्याचे बंद करा असे सांगितले होते. याचा राग मनात धरून रविवारी रात्री प्रणव ढेकळे व व त्याचे वडील ब्रम्हानंद यांनी येवून शिवीगाळ करून कंपनी कशी चालवतो तेच बघतो, असे म्हणून रॉडने मारहाण केली. फिर्यादी यांनाही मारहाण करून जातीवाचक शिवीगाळ केल्याने मोहोळ पोलीस ठाण्यात प्रणव ढेकळे व त्याचे वडील ब्रम्हानंद ढेकळे या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




## महाराष्ट्र पत्रकार संघाचा तालुकाध्यक्ष पदी हुलगे यांची निवड

✔ **नातेपुते** : महाराष्ट्र पत्रकार संघाचे राज्याध्यक्ष विलासराव कोळेकर यांनी महाराष्ट्र पत्रकार संघाच्या पदाधिकारी यांची २०२३ ची नूतन कार्यकारणी घोषित केली. यामध्ये माळशिरस तालुक्यातून पत्रकार क्षेत्रात चांगले काम असलेले संजय दत्तू हुलगे यांना महाराष्ट्र पत्रकार संघाचा माळशिरस तालुका अध्यक्ष पदी निवड करण्यात आली. माळशिरस मध्ये राष्ट्रीय समाज पक्षाची आढावा बैठकीसाठी माजी कॅबिनेट मंत्री तसेच संस्थापक अध्यक्ष महादेवजी जानकर व प्रदेशाध्यक्ष काशिनाथ शेवते, मुख्य महासचिव ज्ञानेश्वरजी सलगर आले असता त्यांनी पत्रकार संजय हुलगे यांची महाराष्ट्र पत्रकार संघाच्या तालुकाध्यक्ष पदी निवड झाल्याने त्यांचा सन्मान करण्यात आला.



## संत रोहिदास जयंतीनिमित्त खाऊ वाटप

✔ **उत्तर सोलापूर** : संत रोहिदास यांच्या जयतीनिमित्त संत रोहिदास सामाजिक संघटना महाराष्ट्र संघटनेच्या वतीने बेघर लोकांना खाऊ वाटप, अन्नदान बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष अमोल शिंदे, माजी महापौर सुधीर खरटमल,संस्थापक अध्यक्ष विठ्ठल व्हणमारे यांच्या हस्ते अध्यक्ष श्रीकांत कांबळे यांच्या अध्क्षतेखालील व दीनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी मनोज चलवादी, उमेश काळे, सनी म्हेत्रे, प्रल्हाद कांबळे, बबलू खरात, सुरेश मोडे, प्रभाकर शिंदे, श्रीनिवास धुळगुंडे, हरी वाघमारे, शिवराज शिंदे, सिध्दु डांगे, कार्तीक नामतुरे, संगमेश्वर कांबळे, शंशिकांत वाघमारे साहेब, सनी पाजंले, विठ्ठल डफळेकर, उमेश कांबळे, नवनाथ चव्हाण, विष्णु गायकवाड, अनिता गवळी, विजया राऊत यांच्यासह समाज बांधव उपस्थित होते.

## तरूणाच्या मृत्यूप्रकरणी वीटभट्टी मालकावर गुन्हा दाखल करण्याची मागणी

✔ **अक्कलकोट** : सुशांत अप्पाराव खिलारे (वय २२, रा.कासेगाव, ता.पंढरपूर) यांच्या मृत्यूप्रकरणी वीटभट्टी मालक व त्यांचे सहकारी यांच्या विरोधात दलित अत्याचार विरोधी कायद्यांतर्गत व डांबून ठेवणे, अपहरण करणे आदी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी लहुजी शक्तीसेना सोलापूर जिल्हा यांच्यावतीने शिष्टमंडळाने उपजिल्हाधिकारी शमा पवार व ग्रामीण पोलिस अधिक्षक यांची भेट घेवून निवेदन देवून मागणी केली आहे. त्याच्या पश्चात आई, वडिल व लहान भाऊ यांच्या उदरनिर्वाहाकरिता शासनाकडून आर्थिक मदतीची मागणी केली आहे. लहुजी शक्तीसेना पश्चिम महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष महादेव भोसले, अनिल बनसोडे, अप्पा बनसोडे, वसंतराव देडे, शशिकांत कसबे, राम कांबळे, दिपक खंडागळे, अण्णा भालेराव, सुरज जाधव, सुनिल रणदिवे, किरण क्षिरसागर आदी मान्यवरांनी उपजिल्हाधिकार शमा पवार व ग्रामीण पोलिस अधिक्षक यांची भेट घेवून सुशांत खिलारे यांच्या मृत्यूप्रकरणी सखोल चौकशी करुन दोषींवर विविध कलमांतर्गत कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## आनंद रजपूत यांच्या स्मरणार्थ बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापना

✔ सुराज्य/कुर्डुवाडी

सम्राट अशोकनगर भोसरे येथे कालकथित समाजसेवक आनंद रजपूत यांच्या स्मरणार्थ रजपूत परिवारातर्फे समाजमंदिरास बुद्ध मूर्ती भेट देण्यात आली होती त्या मूर्तीची प्रतिष्ठापना रविवार दि.५ रोजी भन्ते सारीपुत्त यांच्या मार्गदर्शना खाली करण्यात आली.

तत्पुर्वी भोसरे येथील सम्राट अशोक नगर, राजर्षी शाहू नगर, नमिता नगर, गणेश नगर ,बायपास चौक बार्शीरोड मार्गे या मूर्तीची भव्य अशी मिरवणूक काढण्यात आली या मिरवणूकित महिलांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती.भन्ते सारीपुत्त यांनी बुद्ध वंदने नंतर उपस्थितांना धम्मदेसना दिली.

यावेळी आ. संजयमामा शिंदे, मा. सभापती शीलाताई रजपूत, मा. नगरसेवक अमरकुमार माने, मा. नगरसेविका जयश्री माने, सविता जगताप, भोसरेच्या सरपंच स्वाती कुंभार, उपसरपंच मुनाबी बागवान, ग्रा पं सदस्या सुलन बागल, ग्रा.पं. सदस्य अमोल खोत, प्राचार्य डॉ प्रकाश कांबळे, अर्जून गाडे, मुकुंद बोकेफोडे, जगदीश झिंगळे, प्रा डॉ आशिष रजपूत, प्रा. शशीभूषण कांबळे, सैदागर ताकतोडे, भिमसेन मिसाळ, दत्ता भोसले, विवेक वाघमारे, प्रा.डॉ. सुनील रजपूत, शिवाजी डांगे, बौद्धाचार्य संजय तुपारे, बौद्धाचार्य हनुमंत जगताप, राम डांगे, गणेश बागल,, नसिर शेख, ओंकार पोळके, योगेश रायपूरे आदी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्षा सुनीता वाघमारे, छाया झिंगळे, उषा शेंडगे, लक्ष्मी वाघमारे, ज्योती जानराव, सुनंदा बाबर, भैय्या भालेराव, अमोल रजपूत, प्रदीप भोसले, संभाजी माने, श्रीपाल जानराव, मकसद बागवान, अनिकेत कांबळे, अशपाक बागवान, आदींसह सम्राट अशोक नगर मधील सर्व रहिवाशांनी परिश्रम घेतले.

## नान्नजमध्ये १५० पशुपालकांना मिनरल मिक्सर, कॅल्शियमचे वाटप

✔ सुराज्य/उत्तर सोलापूर

उत्तर सोलापूर नान्नज येथील माणुसकी बहुउद्देशीय सामाजिक संस्था व नान्नज पशूसंवर्धन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जनावरांचे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. लक्ष्मी प्रतिमेचे व गायींच्या पूजनाने जनावरांच्या शिबीराचे उदघाटन करण्यात आले.

पशूधन विकास अधिकारी एम. बनगर यांनी जनारांची देखभाल कशी करावी. मिनरल मिक्सर पावडरचे फायदे व दुभत्या जनावरांना चारा कसा द्यावा.जनावरांना कॅलशीमचे फायदे,लाळ्या खुरखुत्या रोग,लंपी या आजाराचे परिणाम या विषयी उपस्थित पशूपालकांना मार्गदर्शन केले.

लसीकरण यांच्या संदर्भात सविस्तर पशुसंवर्धनाविषयी जनजागृती संदर्भात काही उपाययोजना, दुग्ध जनावराची माहिती, भाकड जनावराची माहिती पशुधन विकासअधिकारी डॉ. भाग्यश्री राठोड यांनी दिली. माणुसकी बहुउद्देशीय सामाजिक संस्था व नान्नज पशुसंवर्धन श्रेणी वतीने१५० पशुपालकांना गोळ्या वाटप करण्यात आले. जनावरांची लसीकरण, तपासणी करण्यात आली. श्रीकांत मुळे, रंजीत बोंगे, गणेश देवकुळे, ब्रह्मदेव गवळी, ग्रा.पं सदस्य शिवाजी आवटे, शिरीष म्हमाणे, विनोद माने, भारत बोंगे, भाग्यश्री धुळे, सागर माने, राजू ताकभाते, नंदकुमार विभुते, दयानंद डांगे शेतकरी उपस्थित होते.




# कुलगुरूंची भूमिका शंकास्पद : मस्के

✔ सुराज्य/अकलूज

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू मृणालिनी फडणवीस यांची भूमिका ही एकांगी व दडपशाहीची असल्याने त्यांच्या कार्या विषयी शंका निर्माण होऊ लागल्या असल्याचे राज्यपाल नियुक्त अधिसभा सदस्य सुरज मस्के यांनी म्हटले आहे.

अकलूज येथे झालेल्या पत्रकार परिषदेत ते म्हणाले,विद्यापीठाची अधिसभा बैठक दिनांक ४ फेब्रुवारी रोजी पार पडली या बैठकीमध्ये व्यवस्थापन परिषद निवडणूक तसेच विविध समिती सदस्य निवणूक पार पडली व प्रश्न उत्तरे , प्रस्ताव हे सत्र चालले . पण हे सर्व पाहता निवडणूक व बाकी सत्रामध्ये कुलगुरू यांनी विद्यापीठामधील प्रशासकीय अधिकाऱ्यांना दबावाखाली आणून सर्व केले असल्याचे दिसून आले . प्रथम व्यवस्थापन निवडणूक मध्ये तीन जागांसाठी निवडणूक घेण्यात आल्या यामध्ये विद्यापीठ विकास मंच व सुटा संघटनेचे उमेदवार उभे होते . या निवडणुकीत कुलगुरूंनी कुणाला मतदान करावं हा त्यांचा वैयक्तिक प्रश्न आहे पण त्यांनी निवडणूक प्रक्रिया सुरू झाल्यापासून खुलेआम सुटा च्या उमेदवाराना पाठबळ दिले असल्याचे वारंवार दिसून आले . एक महत्वाच्या संविधानिक पदावर बसलेल्या व्याक्तिकडून अशी अपेक्षा योग्य नाही. ज्यावेळी विविध समिती सदस्यांचे मतदान घेण्याची वेळ आली तेव्हा कुलगुरू स्वतः सुटा च्या पॅनल मध्ये चर्चेला सहभागी होत होत्या व निडणुकीवेळी विद्यापीठ मधील काही प्राध्यापक तटस्थ भूमिका घेत होते पण कुलगुरूंनी काही अधिकाऱ्यांवर दडपशाही आणून स्वतः देखील सुटा च्या उमेदवारांना खुलेआम हात वरती करून मतदान केल्याचे दिसून आले . तसेच निवडणूक निर्णय अधिकारी कुलसचिव योगिनी घारे यांनी हात वरती मतदान प्रक्रिया वेळी प्र कुलगुरू यांना सुटाच्या उमेदवारांच्या वेळी हात वर करा म्हणून खुणावून सांगितले हे सर्व सदस्यांनी पाहिले आहे . निवडणूक निर्णय अधिकारी देखील एकतर्फी असल्याचे दिसून आले आहे . ही बाब असंविधानिक आहे . कोणतेही कुलगुरू मतदान अथवा प्रशासकीय अधिकारी हे मतदान प्रक्रियेमध्ये आवडीने सहभाग घेत नसतात पण कुलगुरू यांनी स्वतःचे पॅनल म्हणून हे सर्व घडवून आणले आहे.



असा आरोप त्यांनी केला आहे . पुढे ते म्हणाले,ही एकाधिकारशाही असून कुलगुरू पदाला अशोभनीय आहे .

प्रश्नउत्तरे वेळी देखील आर्थिक विषयातील प्रश्नांना सीए श्रेणीक शाह यांनी बगल देण्याचे काम केले . शाहा हे कायम काम घेणाऱ्या ठेकेदाऱ्यांच्या बाजूने पोटतिडकीने बाजू मांडताना दिसून आले . यामध्ये आर्थिक गौडबंगाल असल्याचे स्पष्ट होत आहे . त्यासोबत जे राज्यपाल नियुक्त सदस्य आहेत त्यांना या बैठकीमध्ये कोणताही प्रश्न ठराव मांडण्याचा अधिकार देण्यात आला नाही . या साठी जे राज्यपाल नियुक्ती सदस्य आहेत त्यांनी आधी तक्रार केली असता त्यांना नियमाचे कागदे दाखवण्यात आली व या बैठकींमधील त्यांचे अधिकार त्यांना देण्यात आले नाहीत . जे उत्तरे कुलगुरू कडून अपेक्षित होती ती सर्व उत्तरे कुलसचिव देत होत्या .

हे सर्व चित्र पाहता विद्यापीठ मध्ये कुलगुरू एकाधिकार शाही व दडपशाही चे धोरण चालवत असल्याचे दिसून आले आहे . हे चित्र विद्यापीठाच्या हिताचे नसून कुलगुरू स्वतःच्या हिताचे करून घेत आहेत . या पूर्वी देखील कुलगुरू वरती बरेच आरोप असून त्यावरती देखील पांघरून घालायचे प्रयत्न झाले आहेत.यामुळे बाकी अधिसभा सदस्यांना काम करण्याचे अडचणी चे असणार आहे . पण ही एकांगी धोरण मोडून काढून विद्यापीठ हिताचे धोरण राबवण्याकरता संघर्ष करणार असल्याचे मस्के यांनी सांगितले.

# कसब्यातील ब्राह्मण मतदार नाराज, भाजपला धडा शिकवणार

✔ सुराज्य/पुणे

भाजपने कसबा पोटनिवडणुकीसाठी हेमंत रासने यांना उमेदवारी दिल्यानंतर भाजपमध्ये मोठी अंतर्गत नाराजी पाहायला मिळत आहे.

मुक्ता टिळक यांच्या कुटुंबात तिकिट द्यावं, अशी मागणी होत असताना भाजपने मात्र हेमंत रासने यांच्यावर विश्वास दाखवत त्यांना कसब्याचा गड राखण्याची जबाबदारी सोपवली आहे. मात्र, आता रासने यांच्या उमेदवारीनंतर कसब्यात भाजपचा पारंपरिक मतदार असलेला ब्राह्मण समाज नाराज झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. याच अनुषंगाने कसब्यात बॅनर लावण्यात आले असून या बॅनरच्या माध्यमातून ब्राह्मण समाजावर अन्याय झाल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे.

'कुलकर्णींचा मतदारसंघ गेला...टिळकांचा मतदारसंघ गेला...आता नंबर बापटांचा का? समाज कुठवर सहन करणार?' अशा आशयाचे बॅनर कसब्यात लागले आहेत. या बॅनरवर कोणाचेही नाव नसून कसब्यातील एक जागरूक मतदार इतकेच लिहिलेले आहे. त्यामुळे हाच धागा पकडत आता हिंदू महासंघ देखील कसब्याच्या रिंगणात उतरले आहे. हिंदू महासंघाचे आनंद दवे हे आता कसब्याच्या रिंगणात उतरले आहेत. आनंद दवे हे उद्या उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. 'कसबा मतदारसंघातून हिंदू महासंघाचा उमेदवार म्हणून उद्या मी स्वतः अर्ज भरतोय.




ही निवडणूक चुरशीची आणि जिद्दीची सुद्धा आहे. भारतीय जनता पार्टीला वाढवण्यासाठी जेव्हा लोक टिंगळी टवाळ्या करत होती, तेव्हा ज्या समाजाने भारतीय जनता पक्ष वाढवण्याचे सर्वाधिक प्रयत्न केले. त्या समाजाला वाळीत टाकण्याचं काम भारतीय जनता पक्ष करतोय', असं आनंद दवे म्हणाले आहेत.

दरम्यान, कोथरूडचा विषय असो की कसब्याचा पिंपरी-चिंचवडमध्ये जगताप कुटुंबीयांना जो न्याय देण्यात आला, तो न्याय टिळकांच्या घराला कसब्यामध्ये का देता आला नाही?, पुणे जिल्ह्यात २१ आमदार असताना प्रत्येक समाजाचं चांगल्या प्रतिनिधित्व असताना ब्राह्मण समाजाला का डावललं गेलं? हा हिंदू महासंघाचा भाजपला प्रश्न आहे. प्रत्येक समाजाचा नेता त्या समाजाचे प्रश्न सुद्धा मांडत असतो. त्यासाठी राखीव मतदारसंघ सुद्धा असतात हे भारतीय जनता पक्षाला तर माहित नाहीये का हे विचारण्याची वेळ आलीय. असं देखील आनंद दवे म्हणाले आहेत.

यामुळेच स्वतः मी कसब्याच्या रिंगणात उतरण्याचा विचार केलेला आहे. आम्ही उद्या फॉर्म भरतोय. कसब्यात लागलेले सगळे बॅनर असतील. आज टिळक कुटुंब, नगरसेवक किंवा पदाधिकारी हेमंत रासने यांच्या मिरवणुकीत न जाण असेल. ही भारतीय जनता पक्षाला धोक्याची सूचना आहे. हिंदू महासंघाचा उमेदवार निवडून येईल याची खात्री आहे, असे देखील आनंद दवे म्हणाले आहेत.

दुसरीकडे, २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत कोथरूडच्या स्टँडिंग आमदार मेधा कुलकर्णी यांचे तिकिट कापत तत्कालीन भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी निवडणूक लढवली होती. तर आता या पोटनिवडणुकीत टिळकांचे तिकिट कापत ब्राह्मण समाजाचे प्रतिनिधित्व कमी करण्याचा डाव असल्याचा आरोप भाजपवर केला जात आहे. दुसरीकडे आजारी असलेले भाजप खासदार गिरीश बापट यांना देखील डावलून येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत भाजप नवीन चेहरा देण्याचा तयारीत असल्याने ब्राह्मण समाज भाजपवर नाराज असल्याचे बोलले जात आहे. याचा फटका भाजपला बसण्याची शक्यता आहे.



## शक्तीशाली भूकंपाने तुर्की, सिरियात हाहा:कार

✔ **नवी दिल्ली** : तुर्की आणि सीरियात झालेल्या भूकपांत आतापर्यंत १ हजार ६२१ जणांचा मृत्यू झाला आहे. तर हजारो नागरिक जखमी झाले आहेत. मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सोमवारी पहाटे हा भूंकप झाला. त्याची तीव्रता ७.९ रिश्टर स्केल होती. त्यानंतर दुपारीही या ठिकाणी भूकंपाचे धक्के जाणवले. दुपारी दक्षिण तुर्की झालेल्या भूकंपाची तीव्रता ७.६ रिश्टर स्केल इतकी होती. या घटनेबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला आहे. तुर्की व सीरियाला भारताकडून मदतही पाठवली जाणार आहे.

सोमवारची पहाट तुर्की व सीरियासाठी शोक संदेशच घेऊन आली. सकाळी ७.९ रिश्टर स्केलच्या भूकपांने ही दोन्ही शहरे हादरली. भूकंपाची तीव्रता एवढी होती ही या दोन्ही देशातील इमारती पत्त्यासारख्या कोसळल्या. अनेकांचे कुटुंब उद्ध्वस्त झाले. काहींची घरे जमीनदोस्त झाली. पहाटे ४ वाजून १७ मिनिटांनी भूकंपाचा पहिला धक्का बसला. तुर्कस्तानच्या गाझियानटेप येथे हा भूंकप झाला. गाझियानटेप हे भूकंपाचे केंद्रस्थान असल्याने आसपासच्या परिसरात मोठी हानी झाली. त्यानंतर दुपारी पुन्हा दक्षिण तुर्की परिसरात भूकंपाचे धक्के बसले. ७.६ रिश्टर स्केल एवढी भूकंपाची तीव्रता होती. या घटनेचा एक व्हिडिओही सोशल मिडियावर व्हायरल झाला आहे. या व्हिडिओत अनेक इमारती कोसळल्याचे दिसत आहे. नागरिक भयभीत होऊन आक्रोश करताना दिसत आहेत. ढिगाऱ्याखाली हजारो नागरिक अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## राजकारण खूप झाले, भावना पक्षश्रेष्ठींना कळवल्यात : थोरात

✔ सुराज्य/मुंबई

नाशिक पदवीधर निवडणुकीत झालेल्या राजकारणावरून सत्यजीत तांबेंनी आपली भूमिका मांडली. प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंवर सत्यजीत तांबेंनी आरोप केले आहेत.

या राजकिय घडामोडींवर काँग्रेस नेते बाळासाहेब थोरातांनी प्रतिक्रिया दिली.



व्यथित करणारं राजकारण झालं, माझ्या भावना पक्षश्रेष्ठींना कळवल्यात, असं थोरात म्हणाले.

## योगी सरकारचा अदानी समूहाला झटका

✔ सुराज्य/उत्तरप्रदेश

हिंडनबर्गच्या अहवालानंतर अदानी समूहाच्या शेअर्समध्ये मोठी घसरण झाली. यानंतर आता उत्तरप्रदेश सरकारनेही अदानींना झटका दिला आहे. उत्तरप्रदेश सरकारने अदानी समूह, जीएमआर आणि इनटेली स्मार्ट कंपनींचं ५ हजार ४५४ कोटी रुपयांचं काम रद्द केलं आहे. या अंतर्गत संपूर्ण राज्यात २.५ कोटी प्रीपेड स्मार्ट मीटर बसवण्यात येणार होते.

## ...आता नंबर बापटांचा का?

✔ सुराज्य/पुणे

**कसबा पेठ विधानसभा मतदारसंघाच्या आमदार मुक्ता टिळक यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या जागेवर पोटनिवडणूक होत आहे. यासाठी २६ फेब्रुवारीला मतदान होणार आहे. कसब्यात उमेदवारी देताना भाजपला मोठी कसरत करावी लागली. अखेर उमेदवारीची माळ माजी स्थायी समिती अध्यक्ष हेमंत रासने यांच्या गळ्यात पडली. पण आता टिळकांच्या घरात उमेदवारी न देता भाजपने घराबाहेरील उमेदवार दिल्याने मोठी नाराजी उफाळल्याचे चित्र आहे.**

मुक्ता टिळक यांचे पती शैलेश टिळक यांनी देखील याबाबत नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर आता पुन्हा भाजपमधील नाराजी नाट्य उघड झाले आहे. 'कुलकर्णी यांचा मतदारसंघ गेला. टिळकांचा

**पुण्यातील बॅनर चर्चेत**

गेला. आता नंबर बापटांचा का?' अशा आशयाचा मजकूर लिहिलेले बॅनर्स कसबापेठेत लागले आहेत. त्यामुळे कसब्यात भाजपविरोधातील नाराजी उफाळून आल्याचे दिसत आहे.

कसबा पेठ पोटनिवडणुकीसाठी हेमंत रासने हे उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. त्यापूर्वीच कसब्यात 'कुलकर्णींचा मतदारसंघ गेला... टिळकांचा मतदारसंघ गेला... आता नंबर बापटांचा का? समाज कुठवर सहन करणार?' अशा आशयाचे बॅनर कसब्यात लागले आहेत. या बॅनरवर कोणाचेही नाव नसून कसब्यातील एक जागरूक मतदार इतकेच लिहलेले आहे.

भाजपने उमेदवारी देताना काही सर्वे केले होते, त्यात भाजपला ही पोटनिवडणूक सोपी नाही, असा निष्कर्ष निघाल्याची माहिती आहे. त्यातही समोर महाविकास आघाडी रवींद्र धंगेकर यांच्यासारखा तगडा उमेदवार देण्याच्या तयारीत असल्याने भाजपने लोकांत असणारा चेहरा उमेदवार देण्याचे ठरवले आणि म्हणूनच शैलेश टिळक यांचा पत्ता कट करण्यात आल्याचं बोललं जात आहे. मात्र, यातून आता ब्राम्हण समाजच भाजपवर नाराज झाला आहे.

## बनावट नियुक्तीपत्र देणाऱ्या टोळीला अटक

✔ सुराज्य/पुणे

**रेल्वेत नोकरी देण्याचे आमिष दाखवून आणि नियुक्तीची बनावट पत्रे देऊन दहा जणांची लाखो रुपयांची फसवणूक करणाऱ्या तिघांच्या टोळीला गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. या टोळीवर बंडगार्डन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

योगेश संतराम माने, नीलेश संतराम माने (रा. ताडीवाला रस्ता) अशी अटक केलेल्या संशयित आरोपींची नावे आहेत. त्यांच्यासह आणखी एकावर



गुन्हा दाखल केला आहे.

### अशी आहे घटना

या प्रकरणी एका व्यक्तींने बंडगार्डन पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार आणि संशयित आरोपी एकमेकांच्या ओळखीचे आहेत. आरोपींनी तक्रारदार आणि त्यांच्या नातेवाइकांना पुणे रेल्वेच्या 'रेल्वे मेल सर्व्हिस' (आरएमएस) विभागात नोकरी लावण्याचे आमिष दाखविले. त्यासाठी त्यांनी दहा जणांकडून दहा लाख ८१ हजार रुपये घेतले. काही दिवसांनंतर आरोपींनी संबंधितांना भारतीय रेल्वेची मुद्रा असलेले 'आरएमएस' विभागातील नोकरीचे बनावट स्वाक्षरीचे नियुक्तीपत्र दिले. तक्रारादारसह सर्व दहा व्यक्ती नियुक्तीपत्र घेऊन रेल्वे प्रशासनाकडे गेल्यानंतर त्यांची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला. त्यानंतर त्यांनी बंडगार्डन पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

## देशातील गरिबी कशी दूर होईल याचा विचार करा : गडकरी

✔ सुराज्य/नवी दिल्ली :

केंद्रीय रस्ते आणि वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी सोमवारी पुन्हा एकदा अर्थसंकल्पाविषयी महत्त्वाचं वक्तव्य केलं आहे. १ फेब्रुवारीला निर्मला सीतारमण यांनी जो अर्थसंकल्प सादर केला तो देशातली गरीबी दूर करण्याच्या अनुषंगानेच सादर केलेला अर्थसंकल्प होता असं नितीन गडकरींनी म्हटलं आहे. एवढंच नाही तर देशातल्या द्रुतगती महामार्गांचं जाळं कसं असणार आहे त्याचप्रमाणे त्यामागे सरकारचं धोरण काय आहे यावरही नितीन गडकरी यांनी भाष्य केलं आहे.

देशाच्या अमृत काळातला हा अर्थसंकल्प आहे या अर्थसंकल्पामुळे देश प्रगतीपथावर जाईल, असंही नितीन गडकरींनी म्हटलं आहे.

## पुण्यानंतर कोयता गँगची नगरमध्ये दहशत



✔ **नगर** : पुण्यानंतर आता नगरमध्ये देखील कोयता गँगची दहशत निर्माण झाली आहे. गुरुवारी पहाटे सुपा येथील पान दुकानावर कैफ मन्यार आणि त्याच्या सहकाऱ्यांनी कोयते नाचवत पान दुकानाची तोडफोड केली. त्यानंतर एकाला मारहाण करत जखमी केलं आहे. या सर्व घटनेचा थरारक व्हिडिओ सीसीटीव्हीमध्ये कैद झाला असून पोलिसांनी एकाला अटक केली आहे.

समीर जब्बार सय्यद (रा. सुपा) यांनी सुपा पोलिसांना दिलेल्या फिर्यादीत म्हटलं आहे की, गुरुवारी पहाटे दोन वाजेच्या सुमारास अहमदनगर-पुणे महामार्गावर दरवेश हॉटेल जवळील हिरा मोती पान दुकानाजवळ काही तरुण थांबले होते. त्यानंतर ते तेथे जवळच लघु शंका करु लागले. तेव्हा पान दुकानावरील समीर सय्यद यांनी त्यांना तुम्ही येथे लघुशंका करु नका तेथे समाज मंदिर आहे असं म्हणाले. तेव्हा तेथे प्रवासी युवक व स्थानिक युवक याच्यांत शाब्दिक बाचाबाची झाली. त्यावेळी ते प्रवासी युवक शिवीगाळ करत पुण्याच्या दिशेने निघून गेले. त्यानंतर थोड्याच वेळात पुणे जिल्ह्यातील गुन्हेगार कैफ मन्यार हा आपल्या सहकाऱ्यांसह तेथे आला.

## हम अदाणी के हैं कौन? मोदींना दररोज तीन प्रश्न विचारणार



✔ **नवी दिल्ली** : काँग्रेसने अदाणी समूहावरील आरोपांवरून केंद्र सरकारवर हल्लाबोल केला आहे. काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी एका निवेदनात म्हटले आहे की, काँग्रेस या मुद्द्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदींना दररोज तीन प्रश्न विचारणार आहे. दरम्यान, अदाणी समूहावर आरोप होत असताना मोदी सरकारने याबाबत मौन बाळगले आहे.

जयराम रमेश म्हणाले की, '४ एप्रिल २०१६ रोजी पनामा पेपर्स खुलाशांना उत्तर देताना अर्थ मंत्रालयाने घोषणा केली होती की, मोदी यांच्याकडून एका मल्टी एजन्सी सर्च एजन्सीला आर्थिक देवाण घेवाणीवर लक्ष ठेवण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानंतर ५ सप्टेंबर २०१६ रोजी हाँग्जो (चीन) येथे जी-२० शिखर संमेलनात तुम्ही (मोदी) म्हणालात की, 'आम्ही आर्थिक गुन्हेगारांचे सुरक्षित आश्रय नष्ट करण्यासाठी, त्यांना ट्रॅक करण्यासाठी कारवाई करणार आहोत. बँकिंग गोपनीयता जी भ्रष्टाचाऱ्यांना आणि त्यांची कामं लपवते, त्यासंबंधी कारवाई करू. त्यावर कोणतेही कार्यवाही झालेली नाही. आता तुमचं सरकार HAHK (हम अदाणी के हैं कौन)' पासून लपू शकत नाही.

## अदानी समूहाच्या देशविदेशात शेकडो बोगस कंपन्या

✔ सुराज्य/मुंबई

अदाणी समूहाच्या देशविदेशात शेकडो बोगस कंपन्या असून अब्जावधी रूपयाचा भ्रष्टाचार समोर येत आहे.

एल.आय.सी., स्टेट बँक, एअरपोर्ट, रेल्वे अशा ठिकाणची गुंतवणूक धोक्यात आणली असतानाही केंद्रातील भाजप सरकार त्यांना पाठीशी घालत असल्याचा आरोप काँग्रेसचे नेते आणि माजी मंत्री नसीम खान यांनी सोमवारी ठाण्यात केला. त्यावेळी काँग्रेसचे नेते नसीम खान यांच्यासमवेत ठाणे काँग्रेस अध्यक्ष विक्रांत चव्हाण, प्रदेश काँग्रेस सचिव मनोज शिंदे, ठाणे प्रवक्ते सचिन शिंदे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.



## कन्हानमध्ये गुंडांचा हैदोस; आमदाराने रस्त्यातच केली पोलिसांची खरडपट्टी

✔ सुराज्य/नागपूर

कन्हान येथील आठवडी बाजारात गुन्हेगारांनी देशी कट्टे काढले, तलवारी नाचवल्या आणि दुकानांची तोडफोड केली. शनिवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास घडलेल्या या घटनेमुळे गावात दशहतीचे वातावरण तयार झाले. दरम्यान, शिंदे गटाचे आमदार ॲड. आशिष जयस्वाल यांनी आक्रमक पवित्रा घेत पोलिसांची भररस्त्यात खरडपट्टी काढली.

कन्हानमधील तिरुमाला बारसमोर ही घडली. या परिसरात आठवडी बाजार भरतो. खैलेश सलामे (वय ३२), शुभम सलामे (वय २८), सन्नी गजभिये (वय २५), गजानन कळनाके (वय २६), लक्की (वय २४, रा. सगळे कन्हान), गोलू वर्मा (वय २५, रा. कामठी) आणि सौरभ तुलसी राऊत (वय २२, रा. गाडेघाट) अशी आरोपींची नावे आहेत.

### पोलीस निरीक्षकाची बदली

या घटनेच्या २४ तासांतच कन्हानचे पोलीस निरीक्षक विलास दशरथ काळे यांची नियंत्रण कक्षात बदली करण्यात आली. त्यांच्या जागी रामटेकचे पोलीस निरीक्षक प्रमोद मकेश्वर यांची बदली करण्यात आली आहे. याबाबत पोलीस अधीक्षक विशाल आनंद म्हणाले, 'काळेंबाबत यापूर्वीही काही तक्रारी आल्या होत्या. त्यामुळे त्यांची बदली विचाराधीन होतीच. अशातच ही घटना घडल्याने त्यांची तातडीने बदली करण्यात आली आहे.'

## आणखी एका टेक कंपनीचा कामगारांना धक्का, ६६५० जणांची नोकरी जाणार

✔ **नवी दिल्ली** : सध्या जागतिक आर्थिक मंदीमुळे अनेक दिग्गज टेक कंपन्या आपल्या कंपन्यांमध्ये कमर्चाऱ्यांची कपात करत आहेत. यामध्ये Twitter, Meta आणि Apple, Amazon, Microsoft and Google parent, lphabet आघाडीच्या कंपन्यांचा समावेश आहे. याचा भारतातील कंपन्यांनासुद्धा अडचणींचा सामना करावा लागला आहे. रॉयटर्सच्या अहवालानुसार, Dell Technology मधील कमर्चाऱ्यांवर नोकर कपातीची टांगती तलवार आहे. डेल आपल्या एकूण कर्मचाऱ्यांपैकी ५ टक्के कमर्चाऱ्यांची नोकर कपात करणार आहे. म्हणजेच डेल कंपनी ६,६५० कर्मचाऱ्यांची कपात करणार आहे.

## बेस्ट उपक्रमाला ८०० कोटी रुपये

✔ **मुंबई** : आर्थिक स्थिती खालावल्यामुळे डळमळीत झालेल्या बेस्ट उपक्रमाला मुंबई महानगरपालिकेने २०२३-२४ या आर्थिक वर्षांच्या अर्थसंकल्पात मदतीचा हात दिला आहे. आगामी वर्षांच्या अर्थसंकल्पात बेस्ट उपक्रमासाठी ८०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

बेस्ट उपक्रमाला प्रचालन व्यवस्था सुधारण्यासाठी साहाय्य म्हणून अर्थसंकल्पात ही तरतूद करण्यात आली आहे. बेस्टला चालू आर्थिक वर्षांत १३८२ कोटी आगाऊ रक्कम देण्यात आली आहे. ही रक्कम मदत नाही, तर कर्ज म्हणून ग्राह्य धरावी अशी विनंती महानगरपालिकेने राज्य सरकारला केली आहे. याबाबतचा निर्णय राज्य सरकार घेणार आहे.

# जागरूक पालक, सुदृढ बालक मोहिमेचा व्हिसीद्वारे आढावा

✔ सुराज्य/सोलापूर

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाने दिलेल्या सुचनेनुसार सोलापूर जिल्हयातील अंदाजे ११लाख १४ हजार, ० ते १८ वर्षापर्यंतची बालके तसेच किशोरवयीन मुलामुलींच्या सर्वांगीण आरोग्य तपासणीसाठी सार्वजनिक आरोग्य विभाग, वैदयकीय शिक्षण व औषधी । द्रव्य विभाग, एकात्मिक बाल विकास विभाग, शिक्षण विभाग, आदिवासी विभाग व समाजकल्याण विभाग याच्या समन्वयाने अभियान राज्यभर राबविण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

या अभियानामध्ये बालकांची संपूर्ण तपासणी करण्यात येणार असून या तपासणी अभियानात दोषी आढळणाऱ्या बालकांवर तातडीने उपचार करण्यात येणार आहे. हे अभियान ९ फेब्रुवारी पासून संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात राबविण्यात येणार असल्याची माहिती सीईओ स्वामी यांनी दिली.

कोरोना कालावधीत सोलापूर जिल्हा परिषदेमार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांच्या संकल्पनेतून माझे मुल माझी जबाबदारी अभियान राबविले होते. या अभियानात हृदयरोगाची लक्षणे असणारी काही बालके आढळून आली होती. त्यांच्यावर तातडीने उपचार झाल्यामुळे आज ती बालके सुदृढ आहेत. कोरोना सारख्या कठीण परिस्थितीत आपल्या यंत्रणेने उत्तम काम करून कित्येक बालकांना जिवदान दिले होते. याबद्दल सीईओ स्वामी यांनी सर्वांचे यावेळी अभिनंदन केले. याच धर्तीवर राज्य शासनाने जागरूक पालक, सुदृढ बालक, मोहीम घोषित केली आहे. या मोहिमेची पुर्वतयारी व सुक्ष्म नियोजनाची व्हिडिओ कॉन्फरन्स



सीईओ स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. याप्रसंगी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ सोनिया बगाडे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. धनंजय पाटील, जिल्हा मोहीम अधिकारी जावेद शेख, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत कुलकर्णी, यांच्यासह सर्व तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक, बालविकास प्रकल्प अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी या अभियानाची उद्दिष्टे सांगितली.

१- ० ते १८ वर्षापर्यंतची बालकाची / किशोरवयीन मुला-मुलींची प्राथमिक आरोग्य तपासणी करणे.

आजारी आढळलेल्या बालकांवर त्वरीत उपचार करणे.

गरजू आजारी बालकांना सदर्भ सेवा देऊन उपचार करणे (उदा- औषधोपचार, शस्त्रक्रिया

- प्रतिबंधात्मक आरोग्य सुविधा पुरविणे,

- सुरक्षित व सुदढ़ आरोग्यासाठी समूपदेशन करणे.

यामध्ये एकुण ५२ आजारांच्या तपासण्या करण्यात येणार असून तपासणीची ठिकाणे पुढील प्रमाणे असतील.) शासकिय व निमशासकिय शाळा व कनिष्ठ महाविदयालये,) खाजगी शाळा, ३) आश्रमशाळा

अंधशाळा, दिव्यांग शाळा ५) अंगणवाडया,) खाजगी नर्सरी बालवाडया, ७) बालगृहे, बालसुधार गहे

अनाथ आश्रम, ९) समाज कल्याण व आदिवासी विभाग वस्तीगृहे (मुले/मुली).

) शाळाबाहय (यांचे उपरोक्त दिलेल्या नजीकच्या शासकिय शाळा व अंगणवाडीच्या ठिकाणी) मुले-मुली,

अभियानाचे संनियंत्रण करण्यासाठी राज्य कृती दल, जिल्हा कृती दल, म.न.पा कृती दल व तालुका कृती दल असणार आहेत

# समांतर जलवाहिनी योजनेचे काम सुरु करा अन्यथा आंदोलन

## माजी आ.मानेंचा इशारा; आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली मागणी

सुराज्य/सोलापूर

**चार वर्षापूर्वी स्मार्ट सिटी योजनेंतर्गत मंजूर असलेल्या उजनी – सोलापूर समांतर जलवाहिनीचे कामास आठवड्याभरात चालना न मिळाल्यास सोलापूर शहर व हद्दवाढ भागातील नागरीकांच्या पाणीप्रश्नासाठी महापालिकेसमोर आमरण उपोषण आंदोलन करणार करण्यात येईल आणि तरीही कार्यवाही न झाल्यास महापालिका बंद करण्याचा इशारा माजी आमदार दिलीपराव माने यांनी दिला आहे. महानगरपालिका आयुक्तांना भेटून त्यांनी निवेदनाद्वारे ही मागणी केली आहे.**



सोलापूर शहर हद्दवाढ भागातील जनतेच्या पाण्यासाठी केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत उजनी - सोलापूर समांतर पाईप योजना मंजूर करण्यात आली. गेली तीन वर्षापासून उजनी जलाशयात तुंडूब पाणी आहे. मात्र समांतर पाणीपुरवठा योजना पूर्ण न झाल्याने सोलापूर शहरवासीयांना ३-४ तर हद्दवाढ भागातील जनतेला ४-५ दिवसाआड पाणी पुरवठा केला जात आहे. या कामास आठ दिवसात चालना न मिळाल्यास शहरवासीयांसह आंदोलन करणार असल्याचे माने यांनी आयुक्तांना सांगितले. तर समातंर पाईप लाईन पुर्ण होईपर्यत नागरीकांना ५० टक्के पाणीपट्टी आकारणी करण्याची मागणी केली.

सोलापूर शहरात देखील प्रदूषण वाढत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचे दृष्टीने गड्डा यात्रेदरम्यान प्रदूषण नियंत्रक मशनरी उभा केली. त्याप्रमाणे शहरात देखील दक्षता घेणे आवश्यक आहे. शहरातील रस्ते रात्रीच्या वेळी स्वच्छ करावेत, धूळ उडणाऱ्या ठिकाणी पाण्याचे फवारे मारावेत, बांधकाम सुरु असलेल्या ठिकाणी पडदे बंधनकारक करावेत, कचरा रोजचे - रोज उचलावा असे उपाययोजना करण्याची मागणी केली. यावेळी ब्रह्मदेवदादा माने बँकेचे संचालक सोमनाथ गायकवाड, शावरु वाघमारे, महेश घाडगे, परमेश्वर कलशेट्टी, प्रदीप सुरवसे, राहूल जाधव, विकास कदम, अनिल हिबारे, श्रीकांत मेलगे-पाटील, राजू पाटील, सचीन चौधरी, नितीन भोपळे आदिसह शहर व हददवाढीतील कार्यकर्ते उपस्थित होते.

### पार्कवर टेनिस बॉल क्रिकेट सामन्यास परवानगी नको

पार्क मैदानाचे सुशोभिकरण, सोयी-सुविधा केल्यामुळे हे स्टेडीयम आंतरराष्ट्रीय दर्जाचे झाले आहे. तर भविष्यात बी.सी.सी.आय. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने महत्वाचे सामने खेळवले जाणार आहेत. मात्र या अद्यावत मैदानावर टेनीस बॉल क्रिकेट स्पर्धे परवानगी दिली जात असल्याने खेळपट्टी व मैदानाचे अस्तीत्वच धोक्यात येणार आहे. त्यामुळे या मैदानावर टेनीस बॉल क्रिकेट सामन्यास परवानगी देवू नये अशी माने यांनी केली. यासंदर्भात स्टेडीयम कमेटी बैठकीत निर्णय घेण्याचे आश्वासन आयुक्तांनी दिले.

### प्रश्न लवकर मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करू : आयुक्त

समांतर जलवाहिनी कामासंदर्भात तातडीने कार्यवाही करण्याचे प्रयत्न सुरु असून सोलापूर शहरवासीयांच्या महत्वाचा प्रश्न लवकर मार्गी लावण्यासाठी व प्रदूषण रोखण्यासाठी योग्य अमंलबजावणी करण्याचा प्रयत्न करेन, असे आयुक्त शितल उगले-तेली यांनी सांगितले.



## निवडणुकीसाठी शिवसैनिकांनी सज्ज राहावे : अमर पाटील

सोलापूर : प्रभाग क्रमांक १९ मधिल नीलम नगर येथे शिवसेना ठाकरे गटाच्या दक्षिण सोलापूर विधानसभा आणि अक्कलकोट मतदारसंघाच्या जिल्हा प्रमुख पदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी आगामी पालिका आणि विधानसभा निवडणूकीसाठी सज्ज राहण्याचे आवाहन शिवसैनिकांना केले.

निलम नगर येथील शिवसैनिक सचिन घंदुरे, राहुल घंदुरे यांनी या जाहीर सत्कार सोहळ्याचे नियोजन केले होते.नतून जिल्हाप्रमुख अमर पाटील यांच्यासह उपजिल्हा प्रमुखपदी निवड झालेले संतोष केंगनाळकर, उत्तमप्रकाश खंदारे, विष्णू कारमपुरी, बालजी चौगुले यांचा देखिल सत्कार करण्यात आला. यावेळी पाटील म्हणाले दक्षिण विधानसभा आणि अक्कलकोट विधानसभा ताब्यात घेण्यासाठी शिवसैनिकांनी कामाला लागले पाहिजे. त्यापुर्वी हद्दवाढ भागातून जास्ती जास्त शिवसेनेचे नगरसेवक कसे होतील याकडे आपले लक्षकेंद्रीत करणार आहे. यावेळी जिल्हा समन्वयक अजय दासरी, जिल्हा प्रमुख, भीमाशंकर म्हेत्रे, शहर संघटक अतुल भवर, सोलापूर तालुका अध्यक्ष योगीराज पाटील, युवा दक्षिण सोलापूर तालुका प्रमुख धर्मा बगले, काशिनाथ माळगोंडे, संतोष घोडके, विकी खंडागळे उपस्थित होते.

## खासगी सावकरी मोडीत काढणार : गायकवाड

### जिल्हा उपनिबंधक पदाचा घेतला पद्भार

सुराज्य/सोलापूर



जिल्हा उपनिबंधक पदी नियुक्ती झालेले किरण गायकवाड यांनी सोमवारी कुंदन भोळे यांच्याकडून पदभार घेतला. सोलापूर जिल्हातील खासगी सावकरी मोडीत काढण्याचा इशारा देत कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये ऑनलॉईन प्रणालीचा वापर करत शेतकऱ्यांना न्याय देणार असल्याचे सांगितले

जिल्हा उपनिबंधक कुंदन भोळे यांची जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या प्रशासक पदी नियुक्ती झाली आहे. त्यांच्या रिक्त जागेवर झालेले नवे जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांची वर्णी लागली होती. सोमवारी गायकवाड हे सोलापुरात आले कुंदन भोळे यांच्याकडून जिल्हा उपनिबंधक पदाचा पदभार घेतला

गायकवाड हे २००३ साली मुंबई येथे कस्टम ऑफिसर होते. २००७ ते उपमुख्य कार्यकारी अधिकारी झाले २००९ साली जिल्हा उपनिबंधक झाले. गायकवाड म्हणाले सोलापूर जिल्ह्यातील अवैध सावकारकी, बाजार समितीमध्ये सुधारणा तसेच बँकांची थकित कर्जे यावर आपले लक्ष राहिल. खासगी सावकारकीच्या जिल्ह्यात अनेक तक्रारी आहेत. सर्व तक्रारींची शहानिशा करून त्या ३ ते ४ महिन्यात निकाली काढल्या जातील. जिल्ह्यातील अवैध सावकारकी मोडीत काढण्याचा इशारा गायकवाड यांनी यावेळी दिला. कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सर्व बाबी ऑनलाईन प्रक्रिया करून शेतकऱ्यांना न्याय देण्यावर आपला भर राहणार आहे. सहकारी बँकाच्या व्यवहारावर आपली करडी नजर राहणार आहे. बँका बंद पडण्यापेक्षा त्या कशा चालू राहतील याकडे लक्ष केंद्रीत करणार असल्याचे सांगितले.

## जड वाहतूक संदर्भात लवकरच बैठक


सोलापूर : शहरातील जड वाहतूक बंद करावी या मागणी करीता काही संघटनांनी पालकमंत्र्यांशी भेट घेतली.त्यामुळे पोलीस आयुक्तांनी शहरातील जड वाहतूक पंधरा दिवसा करिता बंद करण्याचे फर्मान काढले. आणि यामुळे व्यापारी वर्गात अस्वस्थता पसरली.यावर तोडगा काढण्याकरता जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली लवकरच बैठक होणार असल्याचे पोलीस उपायुक्त अजित बोऱ्हाडे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

१ ते ४ या वेळेत शहरात जड वाहतुकिस परवानगी द्यावी. या मागणी करता असंख्य व्यापारी संघटनांचे अर्ज पोलीस आयुक्तालयात प्राप्त झाले आहेत. दोन्ही बाजू कडून आप आपल्या मागण्या रेटल्या जात असल्याने यावर मार्ग काढण्याकरिता पोलीस आयुक्तांनी जिल्हाधिकारी यांच्याशी संवाद साधला. जिल्हाधिकारी यांनी महापालिका आयुक्त, पोलीस आयुक्त,स्थानिक लोकप्रतिनिधी, उद्योजक उद्योगपती व्यापारी,सामाजिक कार्यकर्ते यांच्याबरोबर लवकरच बैठक घेऊन तोडगा काढणार असल्याचे बोऱ्हाडे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

## तरुणास सत्तुरने मारहाण

सोलापूर : किरकोळ कारणावरून तरुणास लोखंडी सत्तुरने मारून जखमी केल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना दि.५ फेब्रुवारी रोजी फिटनेस जिम शेजारी (जुळे सोलापूर) घडली.याप्रकरणी शशिकांत शंकर यमगार (वय-२५,रा.कल्याण नगर भाग १,) याने फिर्याद दाखल केली आहे.त्याच्या फिर्यादीवरून सिध्दू हिरेमठ (रा. कल्याण नगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस नाईक गावडे हे करीत आहेत.

## वेळापुरात गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त कार्यक्रम



वेळापूर : दरवर्षी प्रमाणे यंदाही वेळापूर येथे जवळेकर गुरुजी यांच्या निवास्थानी गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त तीन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, १३ रोजी गजानन महाराज प्रकट दिन साजरा होत आहे. त्यानिमित्त दिनांक ११ ते १३ फेब्रुवारी दरम्यान सकाळी आठ ते अकरा या कालावधीत गजानन विजय ग्रंथाचे पारायण आयोजित केले आहे. ज्यांना पारायणामध्ये भाग घ्यावयाचा आहे त्यांनी शनिवारी सकाळी आठ वाजता आपले ग्रंथ घेऊन गजानन महाराज मंदिर जवळेकर गुरुजी यांच्या घरी हजर रहावे. ज्यांना ग्रंथ नाही त्यांना ग्रंथ उपलब्ध करण्यात येणार आहे. १२ रोजी दुपारी चार वाजता सांगोल्यातील भजनी मंडळाचा कार्यक्रम होणार आहे. १३ रोजी सकाळी आठ ते दहा पारायण व दहा ते बारा भजन व बारा वाजता गुलालाचा कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर आरती व महाप्रसाद होणार आहे. तरी सर्व भाविकांनी या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन मधुकर जवळेकर गुरूजी यांनी केले आहे.

## सुरतगाव अपघातातील जखमी तरुणाचा मृत्यू

सोलापूर : सुरतगाव (ता.तुळजापूर) येथे दुचाकीच्या अपघातात जखमी झालेला किरण मारुती धोत्रे (वय २४ रा. सुरतगाव) हा सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना सोमवारी सकाळी मरण पावला. तो शनिवारी दुपारी निलेश नागेश देवकर (रा.सुरतगाव) याच्यासोबत दुचाकीवरून घरी जात होता. सुरतगाव जवळ दुचाकी घसरल्याने दोघेही जखमी झाले होते. त्यानंतर दोघांना सोलापुरात दाखल करण्यात आले होते. अशी नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## महापुरूषांच्या कार्याचे मूल्यमापन होण्याची गरज : डॉ.चौधरी

सुराज्य/बार्शी



महापुरूषांच्या विचारांचे विकृतीकरण होत आहे. त्यामुळे समाजात चुकीचे संदेश जात आहेत. त्यामुळे महापुरूषांच्या कार्याचे यथार्थ मूल्यमापन होण्याची गरज आहे, असे मत सामाजिक कार्यकर्ते डॉ.विश्वंभर चौधरी यांनी व्यक्त केले.


श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक कर्मवीर डॉ.मामासाहेब जगदाळे यांच्या १२० व्या जयंती निमित्त आयोजित समाजदिन सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी शिक्षणतज्ञ डॉ.बी.एम. हिर्डेकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी खासदार ओमराजे निंबाळकर, आमदार राजेंद्र राऊत, माजी मंत्री दिलीप सोपल, संस्थेचे अध्यक्ष डॉ.बी.वाय.यादव, उपाध्यक्ष नंदकुमार जगदाळे, सचिव प्रकाश पाटील, सहसचिव अरूण देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे व्यासपिठावर उपस्थित होते.

यावेळी संस्थेचे सचिव प्रकाश पाटील यांनी अहवाल वाचनामध्ये संस्थेच्या प्रगतीची माहिती दिली. यावेळी माजी मंत्री सोपल म्हणाले, मामांच्या शिस्त आणि संस्कारामध्ये संस्थेची जडण घडण झाली आहे. या संस्थेचे विद्यार्थी जगभरात पोहोचले आहेत. त्यामुळे संस्थेचे हे विश्वव्यापी झाले आहे. यावेळी आमदार राऊत म्हणाले या संस्थेच्या सर्व प्रकल्पांना सरकारी पातळीवर मदत मिळण्यासाठी लोकप्रतिनीधी म्हणून वचनबध्द आहे. संस्थेने मेडीकल कॉलेज सुरू करण्यासाठी प्रयत्न करावेत. सर्वतोपरी मदत करण्यास तयार आहे.

यावेळी डॉ.चौधरी म्हणाले, ज्यांनी राष्ट्रगीत स्विकारले नाहीत, स्वातंत्र लढ्यात सहभाग घेतला नाही अशी मंडळी दुर्देवाने या देशाला राष्ट्रभक्ती शिकवत आहेत. टोकाच्या राष्ट्रवादातून देश कशी हुकुमशाहीकडे वाटचाल करतो याची अनेक उदाहरणे जगात आहेत. आपल्या देशात असे विचार पसरू नयेत याची दक्षता घेतली पाहिजे. यावेळी अध्यक्षीय समारोपात डॉ. हिर्डेकर यांनी राज्यातील शिक्षण प्रसाराच्या चळवळींची माहिती देत शिक्षण संस्थाचा लवकर उदय झालेल्या गाव आणि शहरांचा विकास झाल्याचे सोदाहरण सांगितले. यावेळी सातारा येथील देशसेवेतील हुतात्मा सैनिक सचिन काटे व गौडगाव येथील रामेश्वर काकडे यांच्या कुटुंबियांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. प्रा.किरण गाढवे आणि ज्योती डोळस यांनी सूत्रसंचालकन केले.

## वाढदिवसानिमित्त श्रीदेवी फुलारे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव

सुराज्य/सोलापूर



माजी नगरसेविका श्रीदेवी फुलारे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला. वाढदिवसादिवशीच संत रोहिदास जयंती असल्याने कार्यकर्ते तसंच समर्थक आणि समाजबांधवातून विशेष आनंद व्यक्त करण्यात आला. विविध स्तरातून वाढदिवसानिमित्त श्रीदेवी फुलारे यांच्यावर शुभेच्छाचा वर्षाव करण्यात आला.

श्रीदेवी फुलारे यांच्या वाढदिवसानिमित्त हुतात्मा चौक येथे त्यांच्या नागरी सत्कार सोहळ्याच आयोजन करण्यात आले होते. शुभेच्छा देण्यासाठी माजी आमदार दिलीप माने, प्रकाश यलगुलवार, माजी महापौर संजय हेमगड्डी, आरिफ शेख, माजी नगरसेवक डॉ किरण देशमुख, गणेश वानकर, तौफिक शेख,किसन जाधव,माजी नगरसेविका संगीता जाधव,देवेद्र भंडारे,माजी सभापती पद्माकर काळे, संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे तसंच अजित गायकवाड,गौतम कसबे, सुरेश पाटोळे , राज सलगर, युथ प्राईड ग्रुपचे समीर शेख, इरफान शेख,नागेश खरात, अजय यादव, नागनाथ कासलोलकर, राजशेखर जेऊरकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. सत्कारादाखल मनोगतात श्रीदेवी फुलारे यांनी सर्वांचे आभार मानले. या प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते जॉन फुलारे यांच्यासह संत रोहिदास जन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच फुलारे समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक अशोक लांबतुरे यांनी केले तर आभार राम कबाडे यांनी मानले.

# छत्रपती शिवाजी महाराज चौकात दोन वर्षांनी रंगणार पाळणा सोहळा

## 'जिजाऊं'च्या वेशभूषेत तीस हजार महिला सहभागी होणार



वेध शिवजन्मोत्सवाचे

सुराज्य/सोलापूर


शिवजन्मोत्सव महामंडळाच्या वतीने यंदा शिवजयंती मोठ्या आणि दिव्य स्वरूपात साजारी केली जाणार आहे. १९ फेब्रुरीरोजी निघणाऱ्या मिरवणूका पारंपारीक वाद्य आणि वेशभूषेत काढण्याचे नियोजन चालू आहे. तर १८ फेब्रुवारी रोजी रात्री १२ वाजता शिवजन्माच्या महोत्सव निमित्त पाळणा होणार आहे. यामध्ये शहर जिल्हातील तब्बल तीस हजार महिला 'जिजाऊं'च्या वेशभूषेत सहभागी होणार आहे. यांचे नेटके नियोजन झाल्याची माहिती मध्यवर्तीमहा मंडळाचे ट्रस्टी अध्यक्ष पद्माकर काळे यांनी दिली

तब्बल दोन वर्षानंतर शिवजयंती साजरी केली जाणार आहे. शहरातील शिव महोत्सव प्रतिवर्षी अगावेगळा असतो. दोन वर्षावी झालेल्या पाळणा सोहळ्याची चर्चा राज्यात झाली होती. त्याच धरर्तीवर अनेक शहरात पाळणा सोहळ्याचे नियोजन केले जाणार होते. मात्र कोरोनाच्या पार्श्वभुमिवर शिवजयंती झालीच नाही. मात्र शहरात सध्या शिवजयंतीची जय्यत तयारी चाली आहे. ठिक ठिकाणी मंडप टाकले आहे. भव्य




दिव्य मिरवणूका काढण्याची तयारी चालु आहे. जवळपास तीस मंडळे मिरवणूकीमध्ये सहभागी होण्याची शक्यता आहे. मंडळाचा सध्या लेझीम, इतर प्रत्यक्षिकाचा सराव चालू आहे.

मध्यवर्ती महामंडाळच्या वतीन यंदाचा १८ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या पाळणाची जय्यत तयारी चालू केली आहे. हा पाळणा सोहळ्यामध्ये महिलांची वेगवेगळी वैशिष्ट्यपूर्ण अशी वेशभूषा असणार आहे. शहर जिल्हातील तीस हजार 'जिजाऊं'च्या वेशभूषेत सहभागी करण्याचे नियोजन आहे. शिवकालीन आणि नऊवारीचा थाट असणारी वेशभूषा महिला साकारणार आहेत.यामध्ये नऊवारी काठपदर, नऊवारी ईरकल, सहावारी ईरकल, पैठणी, कोणतीही काठपदर साडी केशरचना, अंबाडा, गजरा, डोक्यावरून पदर. सर्व पारंपरिक दागिने, नाकात नथ, कानातली चंद्रकोर, कुंकू ठुशी, वज्रटीक, कोल्हापुरी साज, मोहनमाळ, काळी पोत, पाटल्या, बांगडी, बाजुबंद, लक्ष्मीहार, जोडवी, पैंजण, साखळी, तोंडे असे दागिने परिधान करून पारंपरिक वेषात येण्याचे आवाहन केले आहे.



**यंदाच्या शिवजयंती मिरवणूकीत डीजेच्या उंचीवरून महामंडळ आणि साऊंड असोसिएशन यांच्या वाद झाला आहे. चार फुटी टॉफ लावणाऱ्यांना मंडळांना सुविधा देण्याचा निर्णय घेतला आहे. याला महामंडाळाचे ट्रस्टी अध्यक्ष पद्माकर काळे यांनी विरोध केला आहे.**

---

### पोलिस प्रशासानाकडून हालचाली अद्याप नाहीत

अद्याप पोलिस प्रशासानाकडून परवानगीचे काम चालू केले नाही. पदाधिकाऱ्यांची नियोजनाची बैठक घेतली नाही. पूर्वी महामंडाळाच्या माध्यमातून परवाने देण्याचे काम केले जात असे मात्र आता ऑनलाईन परवाने दिले जातात यासाठी एक खिडकी उघडली जाते अद्याप कोणती हालचाली पोलिस प्रशासनाकडून नाहीत.

## लिगोरी खेळण्याच्या कारणावरून मारहाण; तिघांवर गुन्हा

सुराज्य/सोलापूर

लिगोरी खेळण्याच्या कारणावरून लाथा बुक्क्यांनी व लाकडाने मारहाण केल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना दि.४ फेब्रुवारी रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या दरम्यान राघवेंद्र अपार्टमेंट समोरील सार्वजनिक रस्त्यावर घडली.याप्रकरणी शुभांगी सोमनाथ कानडे (वय-४०,रा.राघवेंद्र एजन्सी,अक्कलकोट रोड) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून दिनेश राजनिवास पाचकंटी (वय-२३),नितीन सिध्देश्वर टिंगरे व अमीर इसरार शेख (रा.जुना अक्कलकोट नाका,गांधीनगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. शुभांगी यांचा मुलगा शिवम हा वरील ठिकाणी लिगोरी खेळत होता. त्यावेळी दिनेश पाचकंटी याने रस्त्यावर खेळू नका म्हणून शिवीगाळ केली. याबाबत विचारणा करण्यासाठी गेला असता शिवम याला शिवीगाळ करत अंगावर धावून येऊन मारहाण केली.पुढील तपास पोलीस नाईक कांबळे हे करीत आहेत.

### विवाहितेला दोन लाखांची मागणी करत छळ

विवाहितेला दुसरीकडे घर घेण्यासाठी दोन लाख रुपये घेऊन ये अन्यथा सांभाळणार नाही असे म्हणून हुंड्याची मागणी करत फिर्यादी यांचा शारीरिक व मानसिक छळ करून मारहाण केल्याप्रकरणी पतीसह पाच जणांविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना पुणे येथे घडली.याप्रकरणी सफा तौफिक निटोरे (वय-२६,रा.गरिबी हटाव झोपडपट्टी नंबर-१, विजापूर रोड,सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पती तौसिफ निटोरे,सासु बिसमिल्ला निटोरे,सासरे सत्तार निटोरे,दिर इरफान निटोरे, आसिफ निटोरे व नणंद अफरीन (पूर्ण नाव, पत्ता माहित नाही) (रा.कोंढवा,पुणे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस नाईक सोनार हे करीत आहेत.